दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ८ वे । पाने ८ । मुल्य रू. ५.०० । अंक ४३ । रविवार २२ नोव्हेंबर २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

अहिल्यानगर ● जळगाव ● धुळे ● नंदुरबार ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● धाराशिव ● लातूर ● नांदेड ● परभणी ● हिंगोली ● अमरावती ● अकोला ● यवतमाळ ● बुलढाणा ● वाशिम ● नागपूर ● वर्धा ● भंडारा ● गोंदिया ● चंद्रपूर ● गडचिरोली ● मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड ● रत्नागिरी ● सिंधुदुर्ग ● पुणे ● सातारा ● सांगली ● कोल्हापूर ● सोलापूर ● नाशिक

आदित्य रिन्यूएबल एनर्जी (सोलर प्रोजेक्ट)

पी.एम. सुर्यघर योजना

रू.७८,०००/-

अनुदान,

शासकिय बँकेचे ५.७५% दराने कर्ज तात्काळ जागेवरच मंजूर

२००५ पासून ग्राहकसेवेत



प्रकाश घुगे : ९४२३७८५९६५ ऑफिस : ९८५०७१६४०६

श्रीरामपूर : नगरपालिका हॉस्पिटल समोर, श्रीरामपूर

महत्त्वाचे..

दिवाळीनंतर १८ हजार ५०० रुपयांनी सोने स्वस्त!

मुंबई : सोन्याच्या दरातील घसरणीचे सत्र सुरूच असून अवघ्या नऊ ट्रेडिंग सत्रांत १० ग्रॅम सोन्याचा भाव सुमारे १७ हजार ६०० रुपयांनी घसरला आहे. दिवाळीपासून २४ कॅरेट सोन्याच्या दरात जवळपास १८ हजार ५०० रुपयांची घट झाल्याने ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे.सराफा बाजारात ९९.९ टक्के शुद्धतेच्या सोन्याचा भाव एका सत्रात ५ हजार २०० रुपयांनी घसरून प्रति १० ग्रॅम २ लाख १९ हजार ३०० रुपयांवर आला. सोन्याच्या दरात सलग नवव्या ट्रेडिंग सत्रात घसरण नोंदविण्यात आली.दिवाळीच्या काळात २४ कॅरेट सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅम २ लाख ३३ हजार ५७० रुपयांच्या आसपास होता. २१ नोव्हेंबरला तो सुमारे २ लाख १५ हजार ८० रुपये झाला. तर २२ कॅरेट सोन्याचा दरही १ लाख ३१ हजार ६०० रुपयांवरून १ लाख १४ हजार ६५० रुपयांपर्यंत घसरला.जानेवारीतील विक्रमी उच्चांकाच्या तुलनेतही सोन्याच्या दरात मोठी घसरण झाली.



नोकरीच्या आमिषाने डॉक्टरांनाच गंडा!

११ डॉक्टरांकडून १.१० कोटी उकळल्याचा आरोप

पुणे महापालिकेच्या मेडिकल कॉलेजमधील कथित भरती घोटाळ्याने खळबळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : रुग्णसेवेचा पवित्र धर्म मानल्या जाणाऱ्या वैद्यकीय क्षेत्रालाच काळिमा फासणारा कथित भरती घोटाळा पुण्यात उघडकीस आला आहे. पुणे म हापालिकेच्या भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी मेडिकल कॉलेजमध्ये कायमस्वरूपी नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत ११ कंत्राटी डॉक्टरांकडून प्रत्येकी १० लाख रुपये घेतल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणात तब्बल एक कोटी दहा लाख रुपयांची फसवणूक झाल्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे (एसीबी) करण्यात आली आहे.

धक्कादायक बाब म्हणजे, पैसे गोळा करून ते पुढे पोहोचविण्याचे काम तीन डॉक्टरांनी एजंट म्हणून केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. डॉ. नानासाहेब भांगरे, डॉ. इरफान मुल्ला आणि डॉ. हेमंत वैद्य यांची नावे या तक्रारीत समोर आली आहेत. मात्र, या आरोपांची अद्याप अधिकृत पुष्टी झालेली नाही.

पुणे महापालिकेने चार वर्षांपूर्वी हे वैद्यकीय महाविद्यालय सुरू केले. सुरुवातीला कंत्राटी पद्धतीने डॉक्टरांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर कायमस्वरूपी प्राध्यापक भरतीचा निर्णय झाल्यानंतर एमडी आणि एमएस पदवीधारक डॉक्टरांच्या नियुक्तीचे



आमिष दाखवून पैसे घेतल्याचा आरोप आहे.

विशेष म्हणजे, पैसे देऊनही वर्षभरात ११ डॉक्टरांना नियुक्ती मिळाली नाही. पैसे परत मागितल्यानंतरही टाळाटाळ झाल्याने संबंधित डॉक्टरांनी प्रथम म हापौरांकडे तक्रार केली. मात्र, दाद न मिळाल्याने त्यांनी एसीबीकडे धाव घेतली.

एसीबीचे अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, येत्या दोन-तीन दिवसांत तक्रारदार डॉक्टरांचे सविस्तर जबाब नोंदविण्यात येणार आहेत. त्यानंतर पुणे महापालिका आयुक्तांकडे चौकशीसाठी आवश्यक परवानगी मागितली जाणार आहे. या कथित घोटाळ्यामागे नेमके कोणते सूत्रधार आहेत, भरतीच्या नावाखाली जमा झालेली रक्कम **(पान ४ वर)**

बीडमध्ये ७३ शिक्षकांची सेवा समाप्त; आणखी २,२१७ शिक्षकांवर कारवाईची टांगती तलवार!

बीड : बोगस शिक्षक भरती प्रकरणात शिक्षण विभागाने मोठी कारवाई करत खासगी अनुदानित शाळांमधील ७३ शिक्षकांची सेवा समाप्त केली आहे. यामध्ये प्राथमिक विभागातील ७, तर माध्यमिक विभागातील ६६ शिक्षकांचा समावेश आहे. २०१२ पासून राज्यात शिक्षक भरती बंद असतानाही न्यायालयीन आदेशांचा चुकीचा अर्थ लावून तसेच बनावट विद्यार्थी व कागदपत्रांच्या आधारे पदनिर्मिती करून या नियुक्त्या करण्यात आल्याचे उघड झाले आहे. संचमान्यतेत फेरफार करून पदे वाढविण्यात आल्याचाही आरोप आहे. या प्रकरणाचा पाठपुरावा करणारे सादेक इनामदार यांच्या माहितीनुसार, अशाच प्रकारे बोगस पदे निर्माण करून भरती झालेल्या आणखी २,२१७ शिक्षकांवर कारवाई होण्याची शक्यता आहे.

तीन वर्षे शेतजमीन पडीक ठेवल्यास सरकारजमा!

मोठ्या प्रमाणावर जमीन खरेदी करून पडून ठेवणाऱ्यांना महसूलमंत्र्यांचा इशारा; शेतीयोग्य वापर अनिवार्य करण्याचे संकेत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



नागपूर : शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर शेतजमिनी खरेदी करून त्या वर्षानुवर्षे पडीक ठेवणाऱ्या व्यापारी आणि व्यावसायिकांना राज्य सरकार दणका देण्याच्या तयारीत आहे. तीन वर्षांहून अधिक काळ शेतजमीन पडीक ठेवल्यास ती सरकारजमा करण्यासंदर्भातील कायद्याची पुढील काळात अंमलबजावणी करावी लागेल, असे स्पष्ट संकेत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले आहेत. त्यामुळे शेतजमिनी खरेदी करून भविष्यातील गुंतवणूक म्हणून पडून ठेवणाऱ्यांचे धाबे दणाणण्याची शक्यता आहे.

■ दुष्काळी परिस्थितीमुळे एखाद्या वर्षी जमीन पडीक राहणे समजू शकते; मात्र पुरेसा पाऊस असतानाही जमीन शेतीविना पडीक ठेवता येणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या जमिनींचा तीन वर्षांत शेतीयोग्य वापर केला नाही, तर त्या सरकारजमा करण्याच्या नियमाचा विचार करावा लागेल, असेही त्यांनी सांगितले.

नागपूर जिल्ह्यातील कोराडी येथे शनिवारी (दि. २१) पत्रकारांशी बोलताना बावनकुळे यांनी हा इशारा दिला. काही मोठ्या व्यापाऱ्यांनी १००, २०० ते ४०० एकरांपर्यंत शेतजमिनी खरेदी करून ठेवल्या आहेत. मात्र, त्यावर कोणतीही शेती केली जात नाही. केवळ जमिनी खरेदी करून ठेवण्याचा व्यवसाय सुरू असल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले.

दरम्यान, शेतजमिनींच्या बेकायदेशीर खरेदी-विक्री व्यवहारांवरही सरकारची नजर आहे. बिगरशेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणावर शेतजमिनी खरेदी करण्याच्या व्यवहारांबाबत यापूर्वीच बावनकुळे यांनी विधानसभेत भूमिका स्पष्ट केली होती. परप्रांतीय व्यक्तींनाही महाराष्ट्रात शेतजमीन खरेदी करताना शेतकरी असल्याचा वैध पुरावा सादर करावा लागेल, असे त्यांनी सांगितले होते.

महसूलमंत्र्यांच्या या विधानामुळे राज्यातील शेतजमीन खरेदी-विक्री, जमिनींचा वापर आणि पडीक जमिनींच्या भवितव्याबाबत नव्याने चर्चा सुरू झाली आहे. मात्र, तीन वर्षे जमीन पडीक ठेवल्यास सरकारजमा करण्याच्या प्रस्तावाची नेमकी कायदेशीर तरतूद, अपवाद आणि अंमलबजावणीची प्रक्रिया स्पष्ट होणे अद्याप बाकी आहे.

महाराष्ट्रावर दुष्काळाचे भीषण संकट...

१९७२ पेक्षाही यंदा रब्बीची पेरणी कमी राहण्याची भीती!

- **राज्यातील ३१० तालुक्यांत दुष्काळ जाहीर**
- **सरासरीपेक्षा १९ टक्के कमी पाऊस**
- **विहिरींनी गाठला तळ**
- **रब्बीचा पेरा २५ लाख हेक्टरपर्यंतच राहण्याचा अंदाज**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

मुंबई : महाराष्ट्रावर पुन्हा एकदा भीषण दुष्काळाचे सावट गडद झाले आहे. ऐन हिवाळ्यात राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये विहिरींनी तळ गाठला असून, नद्या आणि जलस्रोत कोरडे पडू लागले आहेत. पावसाने दिलेल्या ओढीचा थेट फटका शेतीला बसला असून रब्बी हंगामातील पेरणीचे क्षेत्र प्रचंड घटले आहे. विशेष म्हणजे, १९७२-७३ च्या भीषण दुष्काळाच्या तुलनेतही यंदा रब्बीची पेरणी अत्यंत कमी राहण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात पुन्हा १९७२ सारखी दुष्काळी परिस्थिती निर्माण होणार का, असा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे.

राज्यातील दुष्काळाची तीव्रता लक्षात घेऊन सरकारने ३१० तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. १९ नोव्हेंबर २०२६ रोजी यापूर्वीच्या ३०४ तालुक्यांमध्ये आणखी सहा तालुक्यांची भर घालण्यात आली. यंदा राज्यात सरासरीच्या तुलनेत १९ टक्के कमी पावसाची नोंद झाली आहे. प्रशांत महासागरातील एल



निनोच्या प्रभावामुळे मोसमी पावसावर परिणाम झाल्याचे सांगितले जात आहे. परिणामी खरीप हंगामानंतर रब्बी हंगामही संकटात सापडला आहे. कृषी विभागाच्या १९६० पासूनच्या आकडेवारीनुसार, १९७२-७३ मध्ये राज्यात ४७.२९ लाख हेक्टर क्षेत्रावर रब्बीची पेरणी झाली होती. यंदा मात्र आतापर्यंत केवळ १४ लाख ७४ हजार ३०४ हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. डिसेंबरअखेरपर्यंत पेरण्या सुरू राहण्याची शक्यता असली तरी यंदाचा एकूण पेरा जेमतेम २० ते २५ लाख हेक्टरपर्यंतच मर्यादित राहण्याचा अंदाज आहे.

राज्यात रब्बी हंगामाचे सरासरी पेरणी क्षेत्र ५५ ते ६० लाख हेक्टर आहे. यंदाच्या पेरणीमध्ये अन्नधान्य पिकांचे क्षेत्र ७ लाख ७९ हजार ८१२ हेक्टर, कडधान्यांचे ६ लाख ७८ हजार ३८५ हेक्टर, तर तेलबियांचे क्षेत्र अवघे १६ हजार १०६ हेक्टर आहे.

विशेष म्हणजे, १९९१-९२ मध्ये राज्यात ४० लाख हेक्टरवर रब्बी पेरणी झाली होती. तो आजवरचा नीचांक मानला जातो. यंदा मात्र हा विक्रमही मोडण्याची शक्यता आहे. पाण्याअभावी शेतीचे क्षेत्र घटणे, पिकांचे नुकसान, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न आणि पिण्याच्या पाण्याची टंचाई अशा संकटांची मालिका उभी राहण्याची भीती आहे. त्यामुळे दुष्काळ निवारणासाठी सरकारसमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

श्रीरामपूरहून निघालेल्या झायलोचा मनमाडजवळ भीषण अपघात; चार ठार, सात जखमी!

अनकवाडे शिवारात कंटेनरची समोरासमोर धडक; झायलोचा चक्काचूर, मृतांमध्ये तीन महिलांचा समावेश; उत्तर प्रदेशला जाताना काळाचा घाला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : श्रीरामपूर येथून उत्तर प्रदेशातील आपल्या मूळ गावी जाण्यासाठी निघालेल्या प्रवाशांच्या झायलो कारला मनमाडजवळ भीषण अपघात झाला. येवला-मनमाड महामार्गावरील अनकवाडे शिवारात झायलो कार आणि कंटेनरची समोरासमोर जोरदार धडक झाली. या दुर्घटनेत तीन महिलांसह चार जणांचा मृत्यू झाला असून सात जण गंभीर जखमी झाले आहेत. शनिवारी



(दि. २१ नोव्हेंबर) सकाळी आठच्या सुमारास घडलेल्या या अपघाताने श्रीरामपूरसह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, झायलो कार (एमएच १२ एफयू ३७६४) श्रीरामपूर येथून मनमाडच्या दिशेने जात होती. कारमध्ये म हिला, पुरुष आणि लहान मुलांसह एकूण ११ प्रवासी होते. मनमाड रेल्वेस्थानकातून उत्तर प्रदेशला जाणाऱ्या रेल्वेने मूळ गावी जाण्याचा त्यांचा बेत होता. दरम्यान, अनकवाडे शिवारातील रेल्वे ओव्हरब्रिजजवळील अवघड वळणावर मनमाडकडून **(पान ४ वर)**

'गोकुळ'वर दोनच स्वीकृत संचालक राहणार..?

पोटनियम बदलाला महायुतीतूनच विरोध

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कोल्हापूर : गोकुळ दूध संघाच्या संचालक मंडळात स्वीकृत संचालकांची संख्या दोनवरून चार करण्याच्या हालचालींना महायुतीतीलच काही संचालकांच्या विरोधामुळे खीळ बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे गोकुळमध्ये पूर्वीप्रमाणेच दोन स्वीकृत संचालक राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

गोकुळच्या नव्या संचालक मंडळाच्या दोन बैठका पार पडल्या असून स्वीकृत संचालक नियुक्तीबाबत चर्चा सुरू झाली आहे. मात्र, वार्षिक सर्वसाधारण सभेनंतरच याबाबत अंतिम निर्णय होणार आहे. सहकार विभागाने ३० नोव्हेंबरपूर्वी सभा घेण्याचे निर्देश दिले होते. मात्र, नूतन संचालक मंडळाने मुदतवाढ मागितली असून त्यावर सहकार विभागाचा निर्णय अपेक्षित आहे.

मोठी उलाढाल असलेल्या सहकारी संस्थांमध्ये स्वीकृत संचालकांची संख्या दोनवरून चार करण्याची मागणी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली होती.

गोकुळमध्ये भाजप, राष्ट्रवादी, शिंदेसेना आणि जनसुराज्य या पक्षांना संधी देण्यासाठी अडीच-अडीच वर्षांचा फॉर्म्युलाही चर्चेत आहे. मात्र, निवडणुकीत पराभूत झालेल्यांना संधी न देण्याची मुख्यमंत्र्यांची भूमिका असल्याने इच्छुकांच्या आशा अनिश्चित आहेत.'स्वीकृत संचालकांबाबत अद्याप निर्णय घेतलेला नाही. महायुतीचे सर्व नेते मिळून अंतिम निर्णय करतील.' – आ. चंद्रदीप नरके

मारहाण, अपमान अन् मनमानी मजुरीचे दर...

जुन्नरमध्ये हजारो आदिवासी मजुरांचा एल्गार!

अडीच ते तीन हजार मजुरांनी कामावर जाणे टाळले; बनकरफाट्यातील मारहाणीच्या घटनेने असंतोषाचा उद्रेक, प्रशासनाच्या हस्तक्षेपाची मागणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

जुन्नर : शेतात घाम गाळायचा, दिवसभर राबायचे आणि मोबदल्यात अपमान, मारहाण अन् मनमानी मजुरीचे दर सहन करायचे, अशा परिस्थितीला कंटाळलेल्या मुरबाड आणि शहापूर तालुक्यातील आदिवासी मजुरांनी अखेर एल्गार पुकारला आहे.

जुन्नर परिसरातील शेतशिवारात काम करणाऱ्या हजारो मजुरांचा संताप गुरुवारी रस्त्यावर उतरला. बनकरफाटा येथे मजुरांना मारहाण आणि अपमानास्पद वागणूक दिल्याच्या आरोपांमुळे आंदोलनाचा भडका उडाला. अडीच ते तीन हजार मजुरांनी कामावर जाण्यास नकार देत माघारी फिरण्याचा निर्णय घेतल्याने शेतीकामावरही परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

गुरुवारी (दि. २० नोव्हेंबर) पहाटे माळशेज घाटाच्या पायथ्याशी सावर्णे येथे मजुरांनी एकजूट दाखवत कामावर जाणाऱ्या म जुरांची वाहने अडवली. मुरबाड आणि शहापूर तालुक्यांतील आदिवासी कुटुंबांचा उदरनिर्वाह जुन्नरमधील शेतीमजुरीवर अवलंबून आहे. पहाटे तीन-चार वाजता घर सोडून शेतावर जायचे आणि दिवसभर कष्ट करून रात्री उशिरा घरी परतायचे, अशी त्यांची दिनचर्या आहे. मात्र, कष्टाच्या मोबदल्यात अपमान, टोमणे, मारहाण आणि अतिरिक्त काम करून घेतले जात असल्याच्या तक्रारींनी हा असंतोष उफाळून आला.

मजूर प्रतिनिधींच्या आरोपानुसार, शेतकरी वर्गातील अकरा जणांच्या समितीने महिला मजुरांसाठी ७०० रुपये, पुरुषांसाठी ८०० रुपये, तर खुरपणीसाठी ५०० रुपये मजुरी निश्चित केली आहे. मजुरांना विश्वासात न घेता दर ठरविल्याचा त्यांचा आक्षेप आहे. यापूर्वी काही कामांसाठी एक हजार ते बाराशे रुपये मजुरी मिळत असल्याचा दावाही त्यांनी केला आहे.

विशेष म्हणजे, आंदोलनाला विरोध करून कामावर जाणाऱ्या मजुरांना बाराशे रुपये, तर वाहनचालकांना घाटमाथ्यावर वाहने नेल्यास पाच हजार रुपये दंड आकारण्याचा इशाराही देण्यात आला. या दंडात्मक घोषणांच्या कायदेशीर अधिकाराबाबत मात्र प्रश्न उपस्थित होत आहेत.

जिल्हा प्रशासन आणि कामगार विभागाने संयुक्त बैठक घेण्याची मागणी

विकासाच्या दाव्यांनंतरही रोजगारासाठी स्थलांतर करावे लागणाऱ्या आदिवासी मजुरांच्या प्रश्नाने प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे केले आहे. मजुरीचे दर, कामाचे तास, सुरक्षित प्रवास आणि सन्मानाची वागणूक याबाबत ठोस निर्णय घेण्यासाठी ठाणे व पुणे जिल्हा प्रशासन, कामगार विभाग आणि पोलिसांनी संयुक्त बैठक घ्यावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.



महसूल खात्याचा 'सर्जिकल स्ट्राईक'!

दलालशाही, लालफीतशाही आणि भ्रष्टाचाराच्या मुळावर घाव बावनकुळेंच्या निर्णयांनी जमिनीच्या व्यवहारांना नवी दिशा!

संपादकीय

महाराष्ट्रात जमीन हा केवळ मालमत्तेचा विषय नाही, तर तो शेतकऱ्याच्या अस्तित्वाचा, सामान्य माणसाच्या स्वप्नांचा आणि अनेकदा भ्रष्ट व्यवस्थेच्या अर्थकारणाचा केंद्रबिंदू राहिला आहे. सातबाऱ्यावर नाव लावण्यापासून ते जमिनीचा व्यवहार पूर्ण करण्यापर्यंत सामान्य माणसाला तलाठी, मंडळाधिकारी, तहसील कार्यालय आणि दुय्यम निबंधक कार्यालयांच्या चकरा माराव्या लागतात. या व्यवस्थेत दलालांची साखळी तयार झाली आणि सामान्य माणूस त्यात भरडला गेला. मात्र, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारने महसूल व्यवस्थेतील अनेक वर्षांच्या जाचक परंपरांना धक्के देण्यास सुरुवात केली आहे. काही निर्णय थेट जनतेच्या दारात तंत्रज्ञान घेऊन जाणारे आहेत, तर काही निर्णय भ्रष्टाचाराच्या मुळावर घाव घालणारे आहेत. प्रश्न एवढाच आहे की, या निर्णयांची अंमलबजावणी कागदावर न राहता प्रत्यक्षात किती प्रभावी होते?

महसूल विभाग म्हटले की सामान्य माणसाच्या डोळ्यांसमोर सातबारा, फेरफार, मोजणी, वारस नोंद, जमीन खरेदी-विक्री आणि सरकारी कार्यालयांतील हेलपाटे उभे राहतात. एखाद्या शेतकऱ्याला साधा सातबारा मिळवण्यासाठीही अनेकदा विनवण्या कराव्या लागतात, ही वस्तुस्थिती होती. आता डिजिटल स्वाक्षरी असलेले सातबारा, आठ-अ आणि फेरफार उतारे केवळ १५ रुपयांत ऑनलाइन उपलब्ध करून देण्याचा निर्णय झाला आहे. या दस्तऐवजांना शासकीय कार्यालये, बँका, न्यायालये आणि इतर संस्थांमध्ये कायदेशीर मान्यता देण्यात आली आहे. क्यूआर कोड आणि विशिष्ट पडताळणी क्रमांकामुळे बनावट कागदपत्रांना आळा घालण्यास मदत होणार आहे. म्हणजेच तलाठ्याच्या सहीशिक्क्यासाठी दारात उभे राहण्याचे दिवस संपविण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल आहे.

'एक जिल्हा, एक नोंदणी' हा निर्णयही तितकाच महत्त्वाचा आहे. एखाद्या जिल्ह्यातील मालमत्तेची नोंदणी त्याच जिल्ह्यातील कोणत्याही दुय्यम निबंधक कार्यालयात करण्याची सुविधा १ मे २०२५ पासून सुरू झाली. आता 'एक राज्य, एक नोंदणी' ही पुढील संकल्पना आहे. ती पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाली, तर नागपूरची जमीन श्रीरामपूर किंवा मुंबईतून नोंदविण्याची सुविधाही उपलब्ध होऊ शकेल. मात्र, ही राज्यव्यापी व्यवस्था अद्याप संकल्पनेच्या टप्प्यात आहे. नोंदणीसाठी विशिष्ट कार्यालयात जाण्याची सक्ती कमी झाली, तर वेळ, पैसा आणि अनावश्यक मध्यस्थांचा हस्तक्षेपही कमी होईल.

जमिनीच्या व्यवहारातील काळ्या पैशांचा प्रश्नही महसूल विभागाने गांभीर्याने घेतला आहे. दोन लाख रुपये किंवा त्यापेक्षा अधिक रक्कम रोखीने दिल्याचे दस्त नोंदणीच्या वेळी आढळल्यास आयकर विभागाला माहिती कळविण्याची व्यवस्था तयारी सुरू आहे. व्यवहारातील प्रत्येक रुपयाचा मागोवा घेण्याची ही व्यवस्था पारदर्शकतेच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. जमीन व्यवहाराच्या नावाखाली काळा पैसा पांढरा करण्याच्या प्रवृत्तीला यामुळे लगाम बसू शकतो.

महसूल विभागाचा आणखी एक महत्त्वाचा निर्णय म्हणजे तुकडेबंदी कायद्याच्या कचाट्यात अडकलेल्या जुन्या व्यवहारांना दिलेला दिलासा. १५ नोव्हेंबर १९६५ ते १५ ऑक्टोबर २०२४ या कालावधीतील पात्र व्यवहार नियमित करण्याच्या प्रक्रियेत प्रीमियम माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे राज्यातील सुमारे ६० लाख मालमत्ताधारकांना आणि तीन कोटी नागरिकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. अनेक वर्षांपासून सातबाऱ्यावर अडकलेल्या नोंदी आणि कायदेशीर अडचणी दूर होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

शेतजमिनीच्या अकृषिक वापरासाठी स्वतंत्र एनए परवानगी, सनद आणि वार्षिक एनए कराच्या जाचातून मुक्त करण्याचा निर्णयही क्रांतिकारी म्हणावा लागेल. बांधकाम आराखड्याला सक्षम प्राधिकरणाची मंजुरी मिळाल्यानंतर स्वतंत्र एनए परवानगीची आवश्यकता राहणार नाही. वार्षिक एनए कराऐवजी एकरकमी रूपांतरण अधिमूल्याची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे बांधकाम व्यावसायिकांबरोबरच सामान्य जमीनधारकांचीही वर्षानुवर्षांची कटकट कमी होणार आहे.

दुसरीकडे, सरकारी भाडेपट्ट्याच्या जमिनींच्या नोंदी दुरुस्त करून सरकारी मालकीचे संरक्षण करण्याचा निर्णय, मुद्रांक शुल्कविषयक प्रकरणांच्या निपटाऱ्यासाठी अधिकारांचे विकेंद्रीकरण आणि जमिनीच्या नोंदींमधील गैरव्यवहारांवर राज्यव्यापी तपासणी अशा उपाययोजनाही महत्त्वाच्या आहेत. विशेषतः सातबारा आणि फेरफार नोंदींमध्ये झालेल्या गैरव्यवहारांवर कारवाई करण्याची भूमिका घेतल्याशिवाय महसूल प्रशासन स्वच्छ होणार नाही.

आता महसूलमंत्र्यांनी तीन वर्षांपेक्षा अधिक काळ शेतजमीन पडीक ठेवणाऱ्यांबाबत केलेले विधान चर्चेचा विषय ठरले आहे. मोठ्या प्रमाणावर शेतजमिनी खरेदी करून त्या केवळ भविष्यातील नफ्यासाठी पडीक ठेवणाऱ्यांना चाप लावण्याचा सरकारचा विचार आहे. चांगला पाऊस होऊनही जमीन लागवडीखाली आणली जात नसेल, तर अशा जमिनी सरकारजमा करण्याबाबत कायदा करण्याचे संकेत त्यांनी दिले आहेत. हा अद्याप विचाराधीन विषय असला, तरी शेती ही शेतीसाठीच वापरली जावी, हा त्यामागील विचार महत्त्वाचा आहे. मात्र, अशा कोणत्याही कायद्यात शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती, नैसर्गिक आपत्ती, पाण्याची उपलब्धता आणि जमिनीच्या वापरातील अडचणी विचारात घेणे आवश्यक आहे.

खरे तर महसूल विभागात सुधारणा करण्याची गरज कालची नाही. अनेक सरकारे आली आणि गेली; परंतु सातबारा, फेरफार आणि जमिनीच्या व्यवहारातील सामान्य माणसाची परवड कायम राहिली. बावनकुळे यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या या बदलांमुळे आता व्यवस्था बदलण्याची आशा निर्माण झाली आहे. मात्र, निर्णय घेणे आणि त्याची तळागाळात अंमलबजावणी करणे यात मोठे अंतर असते. ऑनलाइन प्रणाली सुरू झाली तरी तलाठी कार्यालयातील अडवणूक संपली नाही, डिजिटल सातबारा मिळाला तरी फेरफारसाठी हेलपाटे सुरूच राहिले, तर या क्रांतीचा उपयोग काय?

महसूल विभागाने आता निर्णयांच्या घोषणांपलीकडे जाऊन त्यांच्या अंमलबजावणीचीही जबाबदारी स्वीकारली पाहिजे. भ्रष्ट अधिकारी, दलाल आणि जमिनीच्या नोंदींमध्ये फेरफार करणाऱ्या प्रवृत्तींवर कठोर कारवाई झाली पाहिजे. शेतकऱ्याला त्याच्या जमिनीचा सातबारा मिळविण्यासाठी कोणाच्याही दारात हात पसरावे लागू नयेत, हीच खऱ्या अर्थाने महसूल सुधारणांची कसोटी आहे. कारण जमीन ही शेतकऱ्याची असते; पण त्या जमिनीच्या कागदपत्रांसाठी शेतकऱ्यालाच सरकारी दारात कैदी बनविणारी व्यवस्था आता बदललीच पाहिजे! महसूल खात्याचा हा बदल केवळ सरकारी निर्णयांचा संच न राहता सामान्य माणसाच्या हक्काचा आणि स्वाभिमानाचा लढा ठरला, तरच या सुधारणांना खऱ्या अर्थाने क्रांती म्हणता येईल!

उंदीरगावात शासकीय कार्यालयांची स्वच्छता मोहीम



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

शिरसगाव : शासनाच्या १०० दिवसीय सुधारणा कार्यक्रमांतर्गत उंदीरगाव येथे १३ ते २० नोव्हेंबरदरम्यान शासकीय कार्यालयीन स्वच्छता व सुविधा तपासणी मोहीम राबविण्यात आली.

मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषदेच्या पथकाने गावातील शासकीय कार्यालयांची पाहणी केली. यामध्ये कार्यालय परिसराची स्वच्छता, नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा, स्वच्छतागृहांची उपलब्धता, नागरिकांना दिल्या जाणाऱ्या शासकीय सेवा आणि त्या विहित मुदतीत मिळतात किंवा नाहीत, याची तपासणी करण्यात आली.

प्रकल्प संचालक राजेंद्र देसले, लेखाधिकारी वर्षा दांडी आणि जिल्हा समन्वयक रवींद्र ठाणगे यांच्या पथकाने संपूर्ण गावातील कार्यालयांची पाहणी केली.

कार्यालयांमधील विविध सुविधांची तपासणी करून पथकाने समाधान व्यक्त केले.

यावेळी अशोक कारखान्याचे संचालक विरेश गलांडे, सरपंच प्रतिभा गोलवड, उपसरपंच आलमनूर शेख, आरोग्य अधिकारी डॉ. सुनील राजगुरू, पंचायत समितीचे विस्तार अधिकारी दिनकरराव ठाकरे, तालुका समन्वयक किरण बारहाते, ग्रामपंचायत अधिकारी प्रदीप आसने, ग्रामपंचायत कर्मचारी शोएब शेख, संजय काळे, रोहित सोमवंशी, नारायण बत्तीसे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

नांदुर्खी बुद्रुकला प्रवरेच्या कृषिदूतांचे आगमन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



लोणी : राहाता तालुक्यातील नांदुर्खी बुद्रुक येथे कृषी महाविद्यालय, लोणी येथील कृषिदूताचे आगमन झाले आहे. यावेळी शेतकऱ्यांनी या कृषिदूतांचे स्वागत केले.

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे व महात्मा फुले कृषी विद्यापीठ संलग्नित कृषी महाविद्यालय, लोणी येथे हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. संस्थेचे अध्यक्ष व राज्याचे जलसंपदा मंत्री ना. डॉ . राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रेरणेने व संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ सुस्मिता विखे पाटील, कृषी संचालक डॉ. उत्तमराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली व कृषी महाविद्यालय लोणीचे प्राचार्य प्रा.अमोल खडके , कार्यक्रम समन्वयक डॉ. रमेश जाधव, कार्यक्रम अधिकारी डॉ. विक्रम अनाप आणि प्रा. अक्षया वाळुंज यांच्या सूचनेनुसार कृषिदूत गितेश देवरे ,रिषभ पवार , हर्षवर्धन देशमुख ,निरज लोढा ,संदेश तांबे हे नांदुर्खी बुद्रुक शेतकऱ्यांचे अनुभव जाणून घेत त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. या प्रसंगी ग्रामपंचायत नांदुर्खी बुद्रुक चे सरपंच माधव चौधरी, उपसरपंच सौ. अलका दाभाडे , ग्रामविकास अधिकारी श्रीराम कोते , तालुका विस्तार अधिकारी गणेश बोगीर,गावचे कृषी सहाय्यक ऋषिकेश काळे , ग्रामपंचायत लिपिक योगेश गोसावी , ग्रामपंचायत कर्मचारी अर्जुन आर्ने आदीं मान्यवरांनी स्वागत केले. कृषी शिक्षणाच्या माध्यमातून हे कृषिदूत येथील शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती, बीजप्रक्रिया , गांडूळखत उत्पादन, चारा पिके, दुग्ध व्यवसाय, बायोगॅस आदी संदर्भात माहिती देणार आहे.

पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे कार्य आजही प्रेरणादायी : माजी आ. मुरकुटे



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी आपल्या कणखर नेतृत्वाने आणि धाडसी निर्णयांनी देशाच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी नाव कोरले आहे. त्यांचे कार्य आजही तरुण पिढीसाठी प्रेरणादायी ठरत आहे. त्यांच्या कार्यकाळात देशात हरित क्रांतीला मोठी गती मिळाली. शेतकऱ्यांना सुधारित बियाणे, खते, पाणी आणि आधुनिक तंत्रज्ञान मिळाल्यामुळे देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वावलंबी बनला. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी त्यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले, असे प्रतिपादन अशोक सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन माजी आ.भानुदास मुरकुटे यांनी केले.

शिवसेना, लोकसेवा विकास आघाडी आणि अशोक उद्योग समूहाचे वतीने इंदिरा गांधी जयंती निमित्त मुरकुटे यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला, तर उपस्थित मान्यवरांनी पुष्प वाहून अभिवादन केले.

याप्रसंगी अशोक सहकारी बँकेचे चेअरमन ड.सुभाष चौधरी, लोकसेवा विकास आघाडीचे शहराध्यक्ष नाना पाटील, शिवसेना तालुका प्रमुख संतोष डहाळे, कारेगाव भाग कंपनीचे संचालक भगवान सोनवणे, पंकज देवकर आदी उपस्थित होते.

लोकसहभागातून वाचनकट्टा उपक्रम शैक्षणिक परिवर्तनाची चळवळ बनेल : वैशाली डिगे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



कोपरगाव : जिल्हा परिषद शाळांमधील वाचनकट्टा हा उपक्रम केवळ शालेय उपक्रम न राहता त्याला लोकसहभागाची जोड मिळाल्यास तो ग्रामीण भागातील शैक्षणिक परिवर्तनाची चळवळ बनू शकतो, असे प्रतिपादन ग्रामीण विकास मंत्रालयाच्या उपसचिव वैशाली डिगे यांनी केले.

संवत्सर येथील जिल्हा परिषद शाळेत सुरू करण्यात आलेल्या कुसुमाग्रज वाचनकट्टा उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. पुणे शिक्षण विभागाचे सहसंचालक रमाकांत काठमोरे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी उपसरपंच विवेक परजणे, राजेश परजणे पाटील, मुख्याध्यापक फैय्याजखान पठाण यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, शिक्षक व ग्रामस्थ उपस्थित होते.

डिगे म्हणाल्या, मोबाईल, दूरचित्रवाणी आणि मनोरंजनाच्या विविध साधनांमुळे विद्यार्थ्यांची वाचनाची आवड कमी होत आहे. अशा परिस्थितीत अवांतर वाचनाची गोडी निर्माण करणे, भाषिक क्षमता व शब्दसंपत्ती वाढविणे आणि स्वतंत्र विचार करण्याची क्षमता विकसित करण्यासाठी वाचनकट्ट्यासारखे उपक्रम महत्त्वाचे आहेत. जिल्हा परिषदेच्या सर्व ग्रामीण शाळांमध्ये हा उपक्रम राबविल्यास सुजाण, सुसंस्कृत आणि विचारशील पिढी घडण्यास मदत होईल.

रमाकांत काठमोरे यांनी संवत्सर शाळेच्या शैक्षणिक प्रगतीचे आणि विविध उपक्रमांचे कौतुक केले. राजेश परजणे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेने राबविलेले उपक्रम इतर शाळांसाठी अनुकरणीय असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना मोबाईलच्या आभासी विश्वातून पुस्तकांच्या ज्ञानसमृद्ध विश्वाकडे वळविण्याचे महत्त्वपूर्ण काम या उपक्रमातून होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

राजेश परजणे यांनी वाचनकट्टा सुरू करण्यामागील भूमिका स्पष्ट केली. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय, आत्मविश्वासाने व्यक्त होण्याची क्षमता आणि स्वतंत्र विचार करण्याची वृत्ती विकसित करणे हा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

ग्रामीण विद्यार्थी क्रीडा क्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी करू शकतात : गौरव डेंगळे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



श्रीरामपूर : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता, जिद्द आणि मेहनत करण्याची तयारी मोठ्या प्रमाणात आहे. त्यांना क्रीडा शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन, सरावासाठी आवश्यक सुविधा आणि प्रोत्साहन मिळाले, तर ग्रामीण भागातील खेळाडू निश्चितच राज्याच्या संघात तसेच देशाच्या संघात स्थान मिळवून आपल्या शहराचे आणि शाळेचे नाव उज्ज्वल करू शकतात, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय स्तरावरील व्हॉलीबॉल प्रशिक्षक गौरव डेंगळे यांनी केले.केंब्रिज हाय इंटरनॅशनल स्कूल, श्रीरामपूर यांच्या सातव्या वार्षिक क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी शाळेचे माननीय सचिव प्रमोद निर्मळ, डायरेक्टर दत्ता पवार, प्राचार्य हेमंत सोलंकी यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी गौरव डेंगळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, क्रीडा क्षेत्र हे केवळ विजय आणि पराभवापुरते मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाचे महत्त्वपूर्ण माध्यम आहे. खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, संघभावना, नेतृत्वगुण, आत्मविश्वास आणि संघर्ष करण्याची वृत्ती निर्माण होते. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने अभ्यासाबरोबरच खेळालाही आपल्या जीवनात महत्त्वाचे स्थान द्यावे. ग्रामीण भागातील खेळाडूंमध्ये राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकण्याची क्षमता असून त्यासाठी योग्य वेळी योग्य मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे.

यानंतर मान्यवरांच्या हस्ते ३० मीटर धावण्याच्या शर्यतीला हिरवा झेंडा दाखवून क्रीडा स्पर्धेचा प्रारंभ करण्यात आला.

स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांसाठी विविध वैयक्तिक व सांघिक क्रीडा प्रकारांचे आयोजन करण्यात आले होते. धावण्याच्या स्पर्धा, मैदानी खेळ तसेच विविध सांघिक खेळांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांमधील क्रीडागुण, चपळता, जिद्द आणि खिलाडूवृत्ती यांचे दर्शन या स्पर्धेतून घडले. विद्यार्थ्यांना अभ्यासासोबत क्रीडा क्षेत्रातही आपले कौशल्य सिद्ध करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा शाळेचा प्रयत्न कौतुकास्पद असल्याचे गौरव डेंगळे यांनी नमूद केले.

या क्रीडा स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे क्रीडा शिक्षक प्रसाद लबडे यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच शाळेतील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी नियोजन, व्यवस्थापन आणि स्पर्धांच्या आयोजनासाठी मोलाचे सहकार्य केले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे सातव्या वार्षिक क्रीडा स्पर्धेचा उद्घाटन सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

विरभद्र देवस्थानच्या विकासात रतीलाल लोढांचे मोलाचे योगदान

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

शिर्डी : लाखो भाविकांचे आराध्य दैवत असलेल्या श्री राजा विरभद्र (विरोबा) मंदिराच्या आजच्या भव्य आणि वैभवशाली रूपामागे दानशूर व्यक्तिमत्त्व व राज्याचे जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांचे विश्वासू सहकारी श्री. रतीलाल पूनमचंद लोढा यांचे मोलाचे योगदान आहे. श्री विरभद्र मंदिर अँड उत्सव ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष म्हणून त्यांनी घेतलेल्या पुढाकारामुळेच या ऐतिहासिक मंदिरांना खऱ्या अर्थाने पुनर्वैभव प्राप्त झाले आहे. शिर्डीच्या श्री साईबाबा समाधी मंदिरापासून अवघ्या ५ किलोमीटर अंतरावर, राहाता तालुक्यातील बन गावात बन रोडवर हे प्रसिद्ध देवस्थान वसलेले आहे. या एकाच परिसरात राहाता गावाचे आणि शिर्डी गावाचे अशी दोन प्राचीन विरोबा मंदिरे आहेत. ही दोन्ही मंदिरे साईबाबा समाधी मंदिरापेक्षाही जुनी असून ब्रिटिश राजवटीच्या काळात यांच्या उभारणीसाठी जमीन देण्यात आली होती, तसेच साईबाबांचेही या प्राचीन मंदिरात आगमन झाले असावे, अशी भाविकांची दृढ श्रद्धा आहे.

काळानुरूप ही दोन्ही मंदिरे जीर्ण झाली होती. मात्र, या ऐतिहासिक आणि धार्मिक ठेव्याचे जतन व्हावे या उदात्त हेतूने रतीलाल लोढा यांनी खंबीर नेतृत्व करत स्वखर्चातून व लोकसहभागातून दोन्ही मंदिरांचा भव्य जीर्णोद्धार केला. सन १९९९ मध्ये सरला बेटचे महंत रामगिरी महाराज (गंगागिरी महाराज संस्थान) यांच्या शुभहस्ते या नूतनीकरण केलेल्या मंदिरांचे उद्घाटन मोठ्या भक्तिभावाने संपन्न झाले.

सध्या या दोन्ही मंदिरांचे व्यवस्थापन श्री विरभद्र मंदिर अँड उत्सव ट्रस्ट (रजि.) यांच्याकडे असून संस्थापक अध्यक्ष रतीलाल लोढा यांच्या मार्गदर्शनाखाली व मंदिराचे व्यवस्थापक श्री. नामदेव दादा बनकर यांच्या सहकार्याने येथे विविध धार्मिक व सामाजिक उपक्रम अखंडपणे सुरू आहेत. यामध्ये नित्य पूजा, आरती, भजन, हरिकथा, श्रावण महिन्यातील सामूहिक विरभद्र चरित्र सप्ताह पारायण, दसऱ्यातील पारंपरिक विशेष नृत्य व ढोल वादन, कार्तिक महिन्यातील तीन दिवसीय उत्सव आणि महाप्रसाद (अन्नदान) यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, दरवर्षी बिरोबा महाराजांची यात्रा भव्य स्वरूपात भरवण्यामध्ये लोढा परिवाराचा सिंहाचा वाटा असतो. रतीलाल लोढा यांनी सुरू केलेला हा सेवा आणि भक्तीचा वारसा त्यांचे सुपुत्र मनोज व महेश लोढा हे देखील तितक्याच निष्ठेने पुढे चालवत आहेत.

आजही स्थानिक ग्रामस्थ कोणताही महत्त्वाचा निर्णय घेण्यापूर्वी या जागृत देवतेकडे कौल लावून मार्गदर्शन घेतात, अशी या मंदिराची ख्याती आहे. एका जीर्ण झालेल्या ऐतिहासिक मंदिराला पुन्हा वैभवाच्या शिखरावर नेणाऱ्या रतीलाल लोढा व लोढा परिवाराच्या कार्याबद्दल शिर्डी व राहाता परिसरातील भाविकांमधून कृतज्ञता व्यक्त होत आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपूर, जि. अहमदनगर (महाराष्ट्र)- ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि. अहमदनगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय- कोहिनूर प्लाझा, दुसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहमदनगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले. संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer Kakasaheb Bahasaheb Nawale To be Printed At Saived Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahmednagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor, Near New Court, Shrirampur, Dist. Ahmednagar, Maharashtra 413 709, India Editor : Karan Babasaheb Nawale" RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com, Email ID- rashtrasahyadri @ gmail.com. Mo. 7774001818

द•ख•ल

फत्याबाद ते आळंदी पायी दिंडी सोहळा २५ नोव्हेंबरपासून

श्रीरामपूर : तालुक्यातील फत्याबाद येथून श्रीक्षेत्र आळंदी देवाची येथे जाणाऱ्या पारंपरिक पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन २५ नोव्हेंबर ते ६ डिसेंबरदरम्यान करण्यात आले आहे. सुमारे ३० वर्षांपासून सुरू असलेली ही वारकरी परंपरा यंदाही भक्तिभावात पार पडणार आहे. भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन दिंडीचे मुख्य सूत्रधार विजय महाराज कुहिले यांनी केले. गुरुवर्य ब्रह्मलीन महंत दत्तगिरीजी महाराज यांच्या आशीर्वादाने आणि स्व. कचेश्वरदादा आठरे यांच्या प्रेरणेतून सुरू झालेल्या या दिंडीचे प्रस्थान २५ नोव्हेंबर रोजी जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत होणार आहे. सरपंच ज्ञानेश्वरी आठरे यांच्या हस्ते रथपूजन करण्यात येणार आहे. महंत कैलासगिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली दिंडी मार्गस्थ होईल. धानोरे, दिग्रस, पिंपळगाव देपा, घारगाव, आळेफाटा, नारायणगाव, पेठ आणि वाकी खुर्द असा प्रवास करून ३ डिसेंबरला दिंडी आळंदीत पोहोचेल. तेथे पेटकर धर्मशाळेत ५ डिसेंबरपर्यंत मुक्काम राहणार असून, ६ डिसेंबरला दिंडी फत्याबादला परतणार आहे.

माजी नगराध्यक्ष अनिल कांबळे यांच्या तैलचित्राचे सोमवारी अनावरण

श्रीरामपूर : श्रीरामपूर नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष कै. अनिल शामराव कांबळे यांच्या तैलचित्राचे अनावरण सोमवार, दि. २३ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता पालिकेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते होणार आहे. आमदार हेमंत ओगले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहणार असून माजी आमदार भानुदास मुरकुटे व भाऊसाहेब कांबळे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. अनिल कांबळे यांनी १९९१-९२ मध्ये श्रीरामपूर नगरपालिकेचे नगराध्यक्षपद भूषविले होते. धडाकेबाज निर्णय घेणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख होती. श्रीरामपूर पीपल्स बँकेचे अध्यक्ष, मर्चंट असोसिएशनचे अध्यक्ष तसेच विविध संस्थांच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक व सहकार क्षेत्रात योगदान दिले. शहरातील युवकांचे संघटन उभारण्यातही त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका होती. ४ डिसेंबर २०२४ रोजी त्यांचे निधन झाले. पालिकेच्या सभागृहात दिवंगत नगराध्यक्षांची तैलचित्रे लावण्याची परंपरा माजी आमदार जयंत ससाणे यांनी सुरू केली होती. कांबळे यांचे तैलचित्रही आता सभागृहात विराजमान होणार आहे. कार्यक्रमास शहर व तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन नगराध्यक्ष करण ससाणे यांनी केले आहे.

गुरुवारी डिजिटल हयात प्रमाणपत्रासाठी कॅम्प

शिरसगाव : येथील ज्येष्ठ नागरिक आनंद मेळावा व पेन्शन असोसिएशनच्या वतीने हयात डिजिटल प्रमाणपत्राचा कॅम्प जुनी तहसील कार्यालय या ठिकाणीचे उपकोषागार कार्यालयात गुरुवार दि २६ नोव्हेंबर सकाळी साडेदहा वाजता सुरू होणार आहे. यासाठी पेन्शनधारकांनी आपले मोबाईल बँकेचे पासबुक आधार कार्ड व पीपीओ नंबर हे सोबत घेऊन, त्या ठिकाणी हजर राहावे. आपले हयात डिजिटल प्रमाणपत्र काढून घ्यावे, असे आवाहन जेष्ठ नागरिक आनंद मेळवाचे अध्यक्ष लक्ष्मण निकम, पेन्शनर असोसिएशन चे के पी बोराडे, प्रा सुभाष लिंगायत यांनी केले आहे.

कोल्हेवाडीत कृषिकन्यांचे स्वागत शेतकऱ्यांना दिली माहिती

संगमनेर : संगमनेर तालुक्यातील मालदाड येथील सेवा संस्कार संस्था संचलित श्रमशक्ती कृषी महाविद्यालयाच्या कृषिकन्यांचे कोल्हेवाडी येथे स्वागत करण्यात आले. ग्रामीण शेती, पीक पद्धती, शेतकऱ्यांच्या समस्या आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थिनींना मिळावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या कृषी महाविद्यालयातील कोमल काळे, ऋतुजा दिघे, भाविका गुंजाळ, साक्षी हत्तरगी, प्रगती काशीद आणि समीक्षा भांगरे या विद्यार्थिनी गावात राहून शेतकरी व त्यांच्या कुटुंबीयांशी संवाद साधणार आहेत. यावेळी सरपंच सुवर्णा दिघे, उपसरपंच इंद्रभान दिघे, ग्रामपंचायत सदस्य, विविध संस्थांचे पदाधिकारी, पत्रकार, शेतकरी ग्रामस्थ मोठ्यासंख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींना अनुभवाधारित शिक्षण मिळण्यासह शेतकऱ्यांनाही आधुनिक शेतीविषयक माहितीचा लाभ होणार आहे.

प्रशिक्षणातून रोजगाराच्या संधी निर्माण करा : डॉ. सुजय विखे पाटील

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



पुणतांबा : शासनाच्या योजनांचा लाभ केवळ अनुदान आणि आर्थिक मदतीपुरता मर्यादित न ठेवता कौशल्य प्रशिक्षणाच्या माध्यमातून रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करा. प्रशिक्षण घेतल्यानंतर घरी बसू नका. रोजगाराची मागणी करणाऱ्या प्रशिक्षित युवकांना काम मिळवून देण्याची जबाबदारी मी स्वीकारतो, अशी ग्वाही भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हा सहकारी बँकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिली.

पुणतांबा येथे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने आयोजित कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमात बांधकाम कामगारांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. प्रमाणपत्रांचे ऑनलाइन वितरण पूर्ण झाल्यानंतर कामगारांच्या खात्यावर प्रत्येकी ४ हजार २०० रुपये जमा होणार असल्याचे त्यांनी सांगितले. शिर्डी व परिसरात औद्योगिक आणि पायाभूत सुविधांची अनेक कामे सुरू आहेत. त्यामुळे स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. युवकांनी आवश्यक कौशल्य आत्मसात करून या संधींचा लाभ घ्यावा. महिला आणि पुरुषांनीही कुटुंबाच्या आर्थिक प्रगतीसाठी समान सहभाग द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

जात-पात आणि धर्माचे भेद बाजूला ठेवून विकासाच्या मुद्द्यावर सर्वांनी एकत्र यावे. दुष्काळ किंवा पाणीटंचाई कोणत्याही एका जातीपुरती मर्यादित नसते. त्यामुळे राजकीय मतभेद बाजूला ठेवून सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत, असेही ते म्हणाले. आर्थिकदृष्ट्या सक्षम कुटुंबांनी स्वस्त धान्य योजनेचा लाभ सोडून तो गरजूंपर्यंत पोहोचवावा, असे आवाहनही त्यांनी केले. तसेच सुमारे ८० हजार अपात्र लाभार्थ्यांची नावे कमी केल्याची माहिती दिली.

शिवस्मारक व व्यापारी संकुलाचे भूमिपूजन डिसेंबरमध्ये

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पुणतांबा येथे छत्रपती शिवाजी महाराजांचे अश्वारूढ स्मारक आणि अत्याधुनिक व्यापारी संकुलासाठी निधी मंजूर झाला आहे. या दोन्ही कामांचे भूमिपूजन ५ किंवा ६ डिसेंबर रोजी सर्व लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत करण्यात येणार असल्याची ग्वाही डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिली. यावेळी त्यांनी प्रस्तावित कामांच्या जागेची पाहणीही केली. यावेळी माजी सरपंच डॉ. धनंजय धनवटे, धनंजय जाधव, दत्ता धनवटे, विजय धनवटे, वैजयंती धनवटे, संध्या थोरात, सुधाकर जाधव, भूषण वाघ, शाम माळी, भास्कर नवले, बांधकाम कामगार संघटनेचे अध्यक्ष अरुण साळुंखे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

शिर्डीत श्री राजा वीरभद्र बिरोबांची यात्रा सोमवारपासून

बुधवारी राज्यस्तरीय कुस्त्यांचा आखाडा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



शिर्डी : येथील निसर्गरम्य विरोबा बन परिसरातील जागृत देवस्थान श्री राजा वीरभद्र बिरोबा यांची वार्षिक यात्रा सोमवार, दि. २३ ते बुधवार, दि. २५ नोव्हेंबरदरम्यान मोठ्या उत्साहात साजरी होणार आहे. वीरभद्र दल व वीरभद्र भक्त मंडळाच्या वतीने यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवारी पहाटे ५ वाजता श्रींची पूजा व अभिषेकाने यात्रेला सुरुवात होईल. सकाळी ५ ते ६ या वेळेत पाण्याची कावड मिरवणूक, तर सकाळी ७ ते सायंकाळी ५ या वेळेत रथ व काठीची मिरवणूक काढण्यात येणार आहे. सायंकाळी भजन, महाप्रसाद, डफाचा खेळ आणि रात्री जागरणाचे कार्यक्रम होतील. मंगळवारी सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत श्रींच्या गणाचा कार्यक्रम होणार असून, सकाळी १० ते १२ या वेळेत ह.भ.प. इंदोरकर महाराज यांचे हरिकीर्तन होईल. बुधवारी यात्रेचा मुख्य दिवस असून, दुपारी ३ ते ६ या वेळेत श्री साईबाबा संस्थानच्या सहकार्याने भव्य कुस्त्यांचा आखाडा रंगणार आहे. यासाठी राज्यभरातील नामवंत मल्ल सहभागी होणार आहेत. सायंकाळी महाप्रसादाने तीन दिवसीय यात्रेची सांगता होणार आहे. परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

कोपरगाव शहरातील विविध विकासकामांसाठी ८८ लाखांचा निधी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



कोळपेवाडी : कोपरगाव शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि नागरिकांना मुलभूत सुविधा देण्यासाठी आ. आशुतोष काळे यांचा सातत्याने राज्य शासनाकडे पाठपुरावा सुरु असतो.

या पाठपुराव्यातून कोपरगाव शहरात नागरी सुविधा, विरंगुळा केंद्रे आणि धार्मिक स्थळांच्या विकासासाठी वैशिष्ट्यपूर्ण योजने अंतर्गत ७८ लाख आणि मोटार वाहन कराच्या अभिहस्तांकित रकमा-रस्ता अनुदान योजनेंतर्गत १० लाख असा एकूण ८८ लाख रुपयांचा निधी राज्य शासनाकडून मंजूर करण्यात आला आहे. या निधीमुळे शहरातील ज्येष्ठ नागरिक व रहिवाशांना विरंगुळा केंद्रे उपलब्ध होणार असून, दळणवळणाच्या रस्ते विकासासह विविध मंदिरांच्या ठिकाणी भाविक व नागरिकांसाठी सभामंडपाची सोय होणार आहे.

त्यामुळे कोपरगावकरांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे. या विकासकामांसाठी ८८ लाख निधी मंजूर केल्याबद्दल आ.आशुतोष काळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आभार मानले आहे.

खरीप पीक विम्याच्या गणनेला डिसेंबरपासून सुरुवात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

ममदापूर : खरीप हंगाम २०२६ मधील पीक विम्याच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची माहिती समोर आली आहे. पीक विम्याच्या नुकसानभरपाई निश्चितीच्या गणना प्रक्रियेला डिसेंबर महिन्यापासून सुरुवात होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यानुसार मूग व उडदाचे कॅल्क्युलेशन १ डिसेंबरपासून, तर सोयाबीन, ज्वारी, बाजरी आणि मक्याचे कॅल्क्युलेशन १५ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. यंदाच्या खरीप हंगामात अनेक भागांत पावसाने ओढ दिल्याने पिकांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे नुकसानभरपाई मिळण्याच्या अपेक्षेने शेतकरी पीक विम्याकडे लक्ष ठेवून आहेत. आता पीकनिहाय गणनेचे संभाव्य वेळापत्रक समोर आल्याने शेतकऱ्यांमध्ये या प्रक्रियेबाबत उत्सुकता आहे. पीक विम्याची नुकसानभरपाई निश्चित करताना संबंधित पिकांचे उत्पादन, पीक कापणी प्रयोगांची आकडेवारी आणि शासनाने निश्चित केलेले निकष विचारात घेतले जातात. या आधारे नुकसानभरपाईची रक्कम तसेच पात्र महसूल मंडळे निश्चित केली जातात. गणना प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कोणत्या भागातील किती शेतकरी पात्र ठरणार आणि त्यांना किती भरपाई मिळणार, हे स्पष्ट होणार आहे. प्रस्तावित वेळापत्रकानुसार मूग व उडदाचे कॅल्क्युलेशन १ डिसेंबरपासून, तर सोयाबीन, ज्वारी, बाजरी आणि मक्याचे कॅल्क्युलेशन १५ डिसेंबरपासून होणार आहे. त्यानंतर पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर विम्याची रक्कम कधी जमा होणार, याकडे लक्ष लागले आहे. दरम्यान, शेतकऱ्यांनी आपल्या पीक विमा अर्जाची स्थिती तपासून बँक खाते, आधार क्रमांक आणि अन्य आवश्यक कागदपत्रांतील माहिती अचूक असल्याची खात्री करावी, असे आवाहन करण्यात येत आहे. डिसेंबरमध्ये सुरू होणाऱ्या या प्रक्रियेमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई मिळण्याबाबतचे चित्र स्पष्ट होण्याची अपेक्षा आहे.

धनादेश प्रकरणी कर्जदारास शिक्षा दुप्पट रक्कम भरण्याचे आदेश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

राहुरी : साई आदर्श मल्टीस्टेट संस्थेच्या दाढ शाखेकडून घेतलेल्या कर्जाच्या परत फेडीसाठी दिलेला धनादेश न वटल्या प्रकरणी दाखल फौजदारी प्रकरणात न्यायालयाने आरोपीस संस्थेत भरलेल्या चेकची दुप्पट रक्कम नुकसान भरपाई देण्याचा आदेश न्यायालयाने दिला आहे. नुकसान भरपाई न भरल्यास दोन महिने साधी कैद भोगावी लागणार आहे.

राहता तालुक्यातील दाढ येथील सतीश रावसाहेब चव्हाण यांनी साई आदर्श मल्टीस्टेट संस्थेच्या दाढ शाखेतून ७५ हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. कर्जाची परत फेड ठरलेल्या मुदतीत न झाल्याने थकबाकी निर्माण झाली.

संस्थेचे कर्मचारी वसुलीसाठी गेले असता सतीश रावसाहेब चव्हाण यांनी स्वतःच्या आयडीबीआय बँकेच्या खात्याचा धनादेश रक्कम १ लाख १ हजार रुपये देत तो वटण्याची हमी दिली मात्र, सदर धनादेश बँकेत सादर केल्यानंतर तो वटला नाही. त्यामुळे साई आदर्श मल्टीस्टेट संस्थेच्या वतीने अहिल्यानगर येथील न्यायालयात नि.ड. क्ट कलम १३८ अन्वये फौजदारी प्रकरण दाखल करण्यात आले.

या प्रकरणाची गुणदोषावर सुनावणी झाली. संस्थेच्या वतीने किरण रसाळ यांची साक्ष नोंदवण्यात आली. तसेच प्रकरणाशी संबंधित आवश्यक कागदपत्रे न्यायालयात दाखल करण्यात आली. फिर्यादाची साक्ष, सादर करण्यात आलेली कागदपत्रे आणि उपलब्ध पुरावा ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपी यांना २ लाख २ हजार रुपये नुकसान भरपाई देण्याचा आदेश दिला.

हा निकाल अहिल्यानगर येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयाचे न्यायमूर्ती के. बी. कामगौडा यांनी दिला.फिर्यादी साई आदर्श मल्टीस्टेट संस्थेच्या वतीने न्यायालयीन कामकाज अक्षय शेळके यांनी पाहिले. त्यांना ड.दिलीप शेळके व ॲड. प्रिया काळे यांनी सहाय्य केले.

महामोर्चात लाखोंच्या संख्येने उपस्थित रहा : दिपक बोऱ्हाडे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



राहुरी : येत्या १ डिसेंबर मंगळवार रोजी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयावर होणाऱ्या धनगर समाज आरक्षण महामोर्चासाठी जिल्ह्यातील समाजबांधवांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मल्हार योद्धा दिपक बोऱ्हाडे यांनी केले आहे. जिल्ह्यातील विविध तालुक्यातील गावामध्ये काही ठिकाणी घोंगडी बैठक तर काही ठिकाणी सभा घेऊन १५ दिवसांपासून स्वतः धनगर समाजाचे नेते दिपक बोऱ्हाडे हे गावोगाव फिरत असून त्यांच्या समवेत इतर समाज बांधव मोठ्या संख्येने सभेला बैठकीस हजर राहून मोठा प्रतिसाद देत आहेत समाजासाठी रात्रंदिवस एक करत गावोगाव भटकंती करत समाजासाठी रान उठविणाऱ्या या मल्हार योध्याच्या पाठीमागे समाज खंबीरपणे उभा राहून ताकद देणार असल्याचे आश्वासन समाजबांधवांनी बोऱ्हाडे यांना दिले आहे. त्यामुळे समाजातून त्यांना मोठे बळ मिळत असल्याचा विश्वास दिपक बोऱ्हाडे यांनी व्यक्त केला आहे.


गावोगाव होणाऱ्या बैठकीत समाजातील महिला, युवक, युवती आणि समाजातील ज्येष्ठ कार्यकर्ते सहभागी होत असल्याने यावेळी मोर्चाला मोठी गर्दी होणार असल्याचे संकेत मिळत असून बोऱ्हाडे यांनी आज नाही तर कधीच नाही शासनाला जाग आणण्यासाठी आता हा लढा निर्णायक असणार असल्याचे सांगून मल्हार मावळ्यांनी एक दिवस आपल्या लेकरांना आरक्षण देण्यासाठी घरादारातील कामे सोडा आणि १ डिसेंबरला आपली संघटित ताकत दाखवा झोपलेल्या शासनाला जागे करण्याची हीच वेळ असल्याचे त्यांनी सांगितले असून समाज जागृती बरोबर समाजाचे संघटन ताकद तयार करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

तरुण मुले, मुली आणि युवक यांनी आता आपल्या भवितव्यासाठी या मोर्चात ताकद दाखविण्याची वेळ आल्याचे त्यांनी सांगितले आहे.

बिबट्यांचा वावर असलेल्या भागांत वनविभागाची यंत्रणा सज्ज ठेवा

आ. अमोल खताळ यांच्या सूचना

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



संगमनेर : मानव-बिबट संघर्षाच्या वाढत्या घटनांना आळा घालण्यासाठी वनविभागाने अधिक सतर्क राहून प्रभावी उपाययोजना कराव्यात. बिबट्यांचा वावर असलेल्या भागांमध्ये आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यासह आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवावी, अशा सूचना आ. अमोल खताळ यांनी वनविभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

संगमनेर येथील सहाय्यक वनसंरक्षक (प्रादेशिक) यांच्या कार्यालयामध्ये वनविभागाच्या कामकाजाबाबतचा आ. खताळ यांनी धावता आढावा घेतला.या या बैठकीस सहाय्यक वनसंरक्षक अमरजित पवार, वन परिक्षेत्र अधिकारी मोहन ताम्हाणे, नम्रता हिरे यांच्यासह वनविभागातील सर्व वनपाल, वनरक्षक, वनमजूर आणि कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते.या बैठकीत प्रस्तावित असलेले वनभवन इमारतीचे काम तसेच निझर्णेश्वर,पेमगिरी व बाळेश्वर येथील वनपर्यटन विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. संबंधित कामांची सद्यस्थिती जाणून घेत वन विभागाच्या विविध उपक्रमां वर चर्चा करण्यात आली.

मानव-बिबट संघर्ष रोखण्यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मागील वर्षी जिल्हा नियोजन समितीच्या माध्य मातून वनविभागाला आवश्यक साहित्य व साधनसामग्री उपलब्ध करून देण्यात आली होती. यामध्ये बिबट बचाव वाहने, ड्रोन, बंदुका आणि पिंजऱ्यांचा समावेश आहे. बिबट्यांचा वावर असलेल्या भागांमध्ये नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणे, बिबट्यांच्या हालचालीं वर लक्ष ठेवणे आणि आपत्कालीन परिस्थितीत तातडीने बचावकार्य राबविणे यासाठी उपलब्ध साधन सामग्रीचा प्रभावी वापर करण्याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. बिबट्यांना सुरक्षितपणे जेरबंद करण्यासाठी प्रशिक्षित असलेल्या संगमनेरच्या बिबट बचाव पथकाने केलेल्या कार्याची दखल घेत या पथकाचा सत्कार करण्यात आला. संगमनेर तालुक्यात बिबट्यांचा वावर असलेल्या परिसरात निर्माण होणार्या आपत्कालीन परिस्थितीत प्रशिक्षित पथकाची भूमिका महत्त्वाची ठरते. त्यामुळे या पथकाने आवश्यक प्रशिक्षण, दक्षता आणि उपलब्ध साधनसामग्रीच्या मदतीने आपले कार्य अधिक प्रभावीपणे पार पाडावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

तालुक्यात जंगल परिसरात पाणवठे सुस्थितीत ठेवणे, पाण्याचीउपलब्धता तपासणे व वन्यजीवांना पाण्यासाठी मानवी वस्त्यांकडे येण्याची वेळ कमी करण्यासाठी आवश्यक नियोजन करण्यावरही भर देण्यात आला. वनविभागाने वन्यजीव संरक्षणासह नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सातत्याने दक्ष राहून काम करावे, असेही आ. अमोल खताळ यांनी सांगितले.

भंडारदरा, निळवंडेच्या आवर्तनामुळे रब्बी पिकांना दिलासा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



प्रवरानगर : अपुऱ्या पावसामुळे निर्माण झालेल्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर भंडारदरा आणि निळवंडे धरणातून सिंचन व बिगर सिंचनासाठी सोडण्यात आलेल्या आवर्तनाचा लाभ लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना होत आहे. गहू, हरभरा, कांदा, चारा आणि भाजीपाला पिकांसाठी हे पाणी उपयुक्त ठरत असून रब्बी हंगामाला काहीसा आधार मिळाला आहे.

यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने खरिपातील पिकांचे नुकसान झाले. त्यामुळे रब्बी हंगामासाठी शेतकऱ्यांचे लक्ष धरणातील पाणीसाठ्याकडे लागले होते. भंडारदरा आणि निळवंडे प्रकल्पांमधून संगमनेर, अकोले, राहाता आणि श्रीरामपूर तालुक्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध होते. निळवंडेच्या डाव्या व उजव्या कालव्यांमधून पाणी शेतापर्यंत पोहोचल्याने अनेक शेतकऱ्यांना पिकांना वेळेवर पाणी देता आले आहे.

जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जलसंपदा विभागाने उपलब्ध पाणीसाठा, सिंचनाची गरज आणि लाभक्षेत्रातील मागणी लक्षात घेऊन आवर्तनाचे नियोजन केले. कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत पाणी वितरणाचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले होते.

या आवर्तनाचा लाभ केवळ शेतीपुरता मर्यादित नसून नदीकाठच्या गावांनाही झाला आहे. अकोले, संगमनेर, राहाता आणि श्रीरामपूर तालुक्यांतील बंधाऱ्यांमध्ये पाणी उपलब्ध झाल्याने पाणीपुरवठा योजनांना तात्पुरता दिलासा मिळाला आहे. त्यामुळे सिंचनाबरोबरच ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासही मदत झाली आहे.

चौकशीची जाहिर नोटीस

कार्यालयाचा पत्ताः सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहिल्यानगर दुसरा मजला, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, आकाशवाणी समोर, सावेडी, अहिल्यानगर- ४१४००३. दिनांक १२/११/२०२८

न्यासाचे नाव :- श्री खंडोबा, म्हाळसा देवी, सच्चिदानंद बाबा, नारदमुनी मंदिर ट्रस्ट मु. पो. नेवासा बु. ता. नेवासा, जि. अहिल्यानगर.

न्यास नोंदणी क्र. ओ-१४९९ (अहिल्यानगर)
योजना चौ. क्र. ७३/२०२६ कलम ५०अ (३)
अर्जदार :- १. श्री एकनाथ सखाराम रेडे, व इतर-८
विरुद्ध
गैरअर्जदारः- १. मुरलीधर नामदेव कराळे, व इतर-९

सर्व संबंधीत लोकांस या जाहीर नोटीशीव्दारे कळविण्यात येते की, धर्मादाय उप आयुक्त, अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर हे वर नमुद नवीन स्किम अर्ज या संबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ५० अ (३) अन्वये स्कीम दुरूस्ती अर्जा संबधी चौकशी करणार आहेत.

१. विश्वस्त :- या न्यासाचे विश्वस्त हे १८ वर्षा वरील असावा व तो नेवासा बु. ता. नेवासा, जि. अहिल्यानगर हददीतील हिंदु समाज्यातील व्यक्ती आसावा.

२. विश्वस्त मंडळ :- विश्वस्त व्यवस्थेचे कमीत कमी ११ व जास्तीत जास्त १५ विश्वस्त राहतील. त्यात पुढीलप्रमाणे पदाधिकारी राहतील. १) अध्यक्ष, २) उपाध्यक्ष, ३) सचिव, ४) खजिनदार व उर्वरित विश्वस्त.

३. विश्वस्तांची पात्रता :- कायदयाने करार करावयास पात्र असलेल्या सज्ञान तसेच सत्प्रवृत्त, कार्यप्रवण, निस्वार्थ बुध्दीने आणि वृत्तीने आचरण करणारा तसेच निर्व्यसनी तळमळीने व समर्पित वृत्तीने आणि निष्ठेने काम करणा-या कोणत्याही हिंदु व्यक्ती या न्यासाचे विश्वस्त म्हणुन नेमणुकीस पात्र राहील.

४. विश्वस्त मंडळ नेमण्याची रित :- या योजनेतील कलम ६ यास बाध न येता एक महिन्यांपुर्वी नवीन विश्वस्तांची नेमणुक करण्यात येईल. जुने विश्वस्त यांना पुढील कालावधी करीता नवीन विश्वस्त म्हणुन नेमलेच पाहिजे असे बंधन राहणार नाही. नवीन नेमलेले विश्वस्त जुन्या विश्वस्ताकडून न्यासाच्या दप्तराचा तसेच स्थावर व जंगम मिळकतीचा पदग्रहण केल्यानंतर त्वरील ताबा घेतील. तसेच सदर ही मौजे नेवासा बु. ता. नेवासा जि. अहिल्यानग या गावच्या ग्रामपंचायत मतदार यादी नुसार मतदान पदधीतन बहुमताने करण्यात येईल. सदर मतदान प्रक्रिया ही मा. उपधर्मादाय आयुक्त कार्यालय अहिल्यानगर या कार्यालयाती मा. निरिक्षक यांचे मार्फत राबवण्यात येईल. विश्वस्त निवडणुक करण्यासाठी ग्रामपंचायत निवडणुक घेणे साठी निवडणुक आयोगाने मान्यता दिलेली चालू ग्रामपंचायत मतदार यादी वापरण्यात येईल. त्या यादी नुसार विश्वस्त निवडणूक प्रक्रिया बहुमताने राबवण्यात येईल. सदर निवडणुक घेणे कामी विश्वस्त मंडळाचा कालावधी संपण्या आगोदर तीन महिने आगोदर पासून नवीन विश्वस्त निवड करणे कामी निवडणूक प्रक्रिया राबवण्यासाठी मा. निरिक्षक साहेब, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यलय, अहिल्यानगर यांना दरम्यानच्या काळात रेकॉर्ड वर कामकाज पाहणारे कोणतयाही दोन विश्वस्त यांनी अर्ज करणे आवश्यक राहील. जर विश्वस्त यांनी विश्वस्त निवड प्रक्रिया राबवण्यासाठी मुदतीत अर्ज दिला नाही. तर गावातील कोणतेही दोन व्यक्ती मा. निरिक्षक साहेब, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अहिल्यानगर यांना विश्वस्त निवड प्रक्रिय राबवण्यासाठी अर्ज करू शकतील व त्या नुसार विश्वस्त निवड प्रक्रिया राबवण्यात येईल.

५. विश्वस्त मंडळाचा कालावधीत :- विश्वस्त मंडळाचा कालावधी हा ५वर्षाचा राहल. मधेच या योजनेतील कलम ११ नुसार रिकाम्या झालेल्या जागी राहिलेले विश्वस्त नवीन विश्वस्ताच्या नेमणुक बहुमताने गावातील निवडणुक आयोगाने मान्यता दिलेली चालू ग्रामपंचायत मतदार यादी मधून करतील. नवीन विश्वस्त त्यावेळच्या विश्वस्ताच्या कालावधीपर्यत कार्यरत राहील. त्याची मुदत संपताच अशा नवीन विश्वस्ताची मुदतआपोआप संपेल.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पूरावा देणेचा असेल, त्यांनी लेखी कैफीयत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासुन ३० दिवसांचे आत या कार्यलयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफीयतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतील कैफीयत न आल्यास कोणीस काही सांगावयाचे नाही, असे समजुन चौकशी पूर्ण केली जाईल, व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिल जातील.

ही नॉटीस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय उप आयुक्त, अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर यांचे शिक्यानिशी आज दिनांक ०४/११/२०२६ रोजी दिली.

(न्याय लिपीक)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर

शिक्का

(अधिक्षक न्याय)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर

पान १ वरुन

श्रीरामपूरहून निघालेल्या झायलोचा मनमाडजवळ भीषण अपघात; चार ठार, सात जखमी!

येवल्याकडे जाणाऱ्या कंटेनरशी कारची जोरदार धडक झाली.

धडकेची तीव्रता एवढी भीषण होती की, झायलो कारचा अक्षरशः चक्काचूर झाला, तर कंटेनर रस्त्याच्या खाली उतरून पलटी झाला. अपघाताचा मोठा आवाज ऐकून परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. महामार्ग पोलिसांनी स्थानिकांच्या मदतीने जखमींना बाहेर काढून तातडीने मनमाड, येवला आणि मालेगाव येथील रुग्णालयांत उपचारासाठी दाखल केले.

या दुर्घटनेत निमाज नियाज शेख (वय २४), शब्बीना रुज्जू शेख (वय २०), हाफीज उन्निसा शेख (वय २५) आणि कलीमुन्निसा अहमद (वय ३०) यांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे. जखमींमध्ये महिला, पुरुष आणि लहान मुलांचाही समावेश असून त्यांच्यावर विविध रुग्णालयांत उपचार सुरू आहेत.

दरम्यान, अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. श्रीरामपूरमधून आपल्या मूळ गावी जाण्यासाठी निघालेल्या कुटुंबीयांवर काळाने घाला घातल्याने परिसरात शोककळा पसरली आहे.

नोकरीच्या आमिषाने डॉक्टरांनाच गंडा!

कुणापर्यंत पोहोचली आणि महापालिकेच्या भरती प्रक्रियेत कोणाचा सहभाग आहे, याचा उलगडा एसीबीच्या चौकशीतून होणार आहे. रुग्णसेवेच्या क्षेत्रातील या गंभीर आरोपांमुळे वैद्यकीय आणि प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

आंतरराष्ट्रीय खेळाडू घडविणाऱ्या टाकळीभानला सुसज्ज क्रीडांगणाची प्रतीक्षा!

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

टाकळीभान : कबड्डीच्या माध्यमातून देश-विदेशात नावलौकिक मिळविणाऱ्या टाकळीभान गावात खेळाडूंसाठी अद्याप पुरेशा क्रीडा सुविधा उपलब्ध नसल्याची खंत व्यक्त होत आहे. आशियाई कबड्डी स्पर्धा आणि राष्ट्रकुल कबड्डी स्पर्धेत सुवर्णपदक मिळविणारे असलम इनामदार व शिवम पटारे यांच्यासारखे दर्जेदार खेळाडू याच मातीत घडले आहेत. मात्र, नवोदित खेळाडूंना सरावासाठी आवश्यक सुविधा मिळत नसल्याने गावात तालुकास्तरीय सुसज्ज क्रीडांगण उभारण्याची मागणी खेळाडू व क्रीडाप्रेमींनी केली आहे.



टाकळीभानने कबड्डी क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. गावातील नामवंत खेळाडूंच्या यशातून प्रेरणा घेऊन अनेक तरुण क्रीडा क्षेत्रात करिअर करण्याचे स्वप्न पाहत आहेत. मात्र, त्यांना सरावासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने त्यांच्या प्रगतीसमोर अडचणी निर्माण होत आहेत. ग्रामपंचायतीने कारेगाव रस्त्यालगत क्रीडांगणासाठी जागा उपलब्ध करून दिली आहे. मात्र, या मैदानावर अद्याप विविध खेळांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण झालेल्या नाहीत. मैदानाची योग्य आखणी व तयारी नसून सकाळी आणि रात्री सराव करणाऱ्या खेळाडूंसाठी पुरेशा प्रकाशाची व्यवस्थाही नाही. मैदानावर हायमास्ट दिवे नसल्याने खेळाडूंना सराव करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

क्रीडा क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू घडविणाऱ्या गावातच खेळाडूंना मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत असेल, तर ही बाब चिंताजनक आहे. त्यामुळे पालकमंत्री, आमदार, खासदार, जिल्हा क्रीडा अधिकारी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. कारेगाव रस्त्यालगतच्या मैदानाचा विकास करून तेथे विविध खेळांसाठी स्वतंत्र सुविधा, प्रकाश व्यवस्था आणि आवश्यक साधनसामग्री उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी होत आहे. टाकळीभान येथे तालुकास्तरीय सुसज्ज क्रीडांगण उभारल्यास परिसरातील ग्रामीण खेळाडूंनाही सरावाची चांगली संधी मिळेल. त्यातून भविष्यात आणखी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडतील. त्यामुळे प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी केवळ आश्वासनांपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष कृती करावी, अशी अपेक्षा खेळाडू व क्रीडाप्रेमींनी व्यक्त केली आहे.

संगमनेर-शिबलापूर-गुहा राज्यमार्गाच्या रुंदीकरणासाठी दादासाहेब पवार आक्रमक। तातडीच्या निधीची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

राहुरी : संगमनेर-शिबलापूर-गुहा राज्यमार्ग क्रमांक २६ वरील ४३.६ किलोमीटर लांबीच्या रस्त्याची दुरवस्था दूर करून संपूर्ण मार्गाचे रुंदीकरण, मजबुतीकरण आणि दर्जेदार डांबरीकरण करण्यात यावे, अशी जोरदार मागणी सामाजिक कार्यकर्ते दादासाहेब कुशाबापू पवार यांनी शासनाकडे केली आहे. यासाठी सुधारित प्रस्ताव सादर करून प्रशासकीय व आर्थिक मंजुरीसह तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

संगमनेर-शिबलापूर-गुहा हा महत्त्वाचा राज्यमार्ग सध्या खड्डे, उखडलेला डांबरी पृष्ठभाग आणि अपुऱ्या रुंदीमुळे अक्षरशः त्रस्त झाला आहे. या मार्गावरून प्रवास करताना वाहनचालक आणि प्रवाशांना मोठी कसरत करावी लागत असून अपघातांचा धोकाही वाढला आहे. नगर-मनमाड आणि नाशिक-पुणे महामार्गांना जोडणारा पर्यायी मार्ग म्हणून या रस्त्याचे महत्त्व मोठे आहे.

या मार्गाचा सर्वाधिक वापर शेतकरी, दूध उत्पादक, व्यापारी आणि कृषिमाल वाहतूकदार करतात. मात्र, रस्त्याच्या दुरवस्थेमुळे वाहनांचे नुकसान, प्रवासाच्या वेळेत वाढ आणि वाहतूक खर्चात भर पडत आहे. परिणामी ग्रामीण भागातील नागरिकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे या रस्त्याची केवळ तात्पुरती डागडुजी न करता कायमस्वरूपी सुधारणा होणे गरजेचे असल्याचे पवार यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे.



विशेष म्हणजे, या रस्त्याच्या सुधारणेसाठी यापूर्वी ८ डिसेंबर २०२३ रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे चर्चा झाली होती. तसेच ११ डिसेंबर २०२३ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंत्यांनी मुख्य अभियंता, नाशिक यांच्याकडे प्रस्तावही सादर केला होता. मात्र, अद्याप या कामाला आवश्यक प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळालेली नसल्याने पवार यांनी पुन्हा शासनाचे लक्ष वेधले आहे.

संपूर्ण ४३.६ किलोमीटर रस्त्याचे तांत्रिक सर्वेक्षण करून आवश्यकतेनुसार रुंदीकरण, मजबुतीकरण, दर्जेदार डांबरीकरण, साईट शोल्डरची उभारणी, पावसाच्या पाण्याचा निचरा, पूल व मोऱ्यांची दुरुस्ती तसेच अपघातप्रवण ठिकाणी सुरक्षिततेच्या उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी त्यांनी केली आहे. कायमस्वरूपी काम सुरू होईपर्यंत रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजवून वाहतूक सुरक्षित करावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

रस्त्याच्या दुरवस्थेमुळे भविष्यात एखादी गंभीर दुर्घटना घडून जीवितहानी होण्याची वेळ येऊ नये, यासाठी प्रशासनाने वेळीच ठोस पावले उचलावीत. अन्यथा जनहितासाठी आंदोलन, उपोषण तसेच उच्च न्यायालयात दाद मागण्याचा मार्ग स्वीकारावा लागेल, असा इशारा दादासाहेब पवार यांनी दिला आहे. एकूणच, संगमनेर-शिबलापूर-गुहा मार्गावरील नागरिकांची गैरसोय दूर करण्यासाठी शासनाने आता केवळ आश्वासनांपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष कामाला सुरुवात करावी, अशी अपेक्षा परिसरातील नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

जलदगती कालव्यातून पाणी सोडले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

वैजापूर : मराठवाड्यातील वैजापूर गंगापूरसह अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्याला सिंचनासाठी व पिण्याच्या पाण्यासाठी अतिशय उपयुक्त असलेल्या नांदूर मधमेश्वर जलदगती मुख्य कालव्यातून रब्बी हंगाम २०२६-२७ साठी पाण्याचे आवर्तन सडण्यात आले.

हे आवर्तन तीन आठवडे सुरू राहणार आहे अशी माहिती नांदूर मधमेश्वर कालवा पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता प्रवीण पाबळे यांनी दिली. नियोजित पाणी पातळी नुसार शुक्रवारी रात्री ३०० क्युसेक या विसर्गाने पाणी सोडण्यात आले. साडे आठशे क्युसेक पर्यंत पाण्याचा विसर्ग वाढवण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. रविवारी सकाळी कालव्याचे पाणी वैजापूर तालुक्याच्या हद्दीत दाखल होणार आहे.

दरम्यान, तालुक्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमूळे कालव्यातून पाणी सोडण्याची मागणी सातत्याने केली जात होती. यासाठी शेतकरी व शेतकरी संघटनांनी नांदुर मधमेश्वर कालवा कार्यालयासमोर उपोषण तसेच महिलांनी लक्षणीय सहभाग नोंदवत येथील उपविभागिय अधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला होता. या पार्श्वभूमीवर, प्रशासनाने कालव्यातून पाणी सोडण्याचा निर्णय घेत त्याची अंमलबजावणी केल्याने लाभधारक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

पायथा ते माथा या नियमानुसार आधी गंगापूर तालुक्यातील गावांना लघुवितरिकांद्वारे पाणी सोडण्यात येणार असून त्यानंतर वैजापूर व गंगापूर तालुक्यातील गावांना याचा फायदा मिळणार आहे. वैजापूर व गंगापूर तालुक्यातील जवळपास ४४ गावांना कालव्याच्या पाण्याचा रब्बी हंगामासाठी लाभ मिळणार आहे. या पार्श्वभुमीवर जिल्ह्यातील कालव्याच्या लाभक्षेत्रात प्रतिबंधक आदेश लागू करण्यात आले आहेत. लाभक्षेत्रातील सर्व शेतकऱ्यांना मंजूर पाणीळीनुसार समन्यायी पद्धतीने पाणी उपलब्ध व्हावे यासाठी हे आदेश लागु करण्यात आले आहेत. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध गुन्हे दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

जिल्हा नियोजन अंतर्गत विकासकामे लागणार मार्गी : आ. कोल्हे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

कोपरगाव : विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी आमदार विवेकभैय्या कोल्हे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांचा विकास करण्यासाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात जिल्हा परिषद अहिल्यानगरच्या माध्यमातून एकूण ३ कोटी ३४ लाख २५ हजार रुपयांच्या ७० विकासकामांना प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. त्यामुळे मतदारसंघातील विविध गावांमधील मूलभूत सुविधांचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

या मंजूर कामांमध्ये प्रामुख्याने पाणीपुरवठा व्यवस्था सुधारणे, अंतर्गत रस्त्यांचे काँक्रिटीकरण, पेव्हर ब्लॉक बसविणे, बीज रस्त्यांची कामे, गटार बांधकाम, रस्त्यांचे मजबुतीकरण आणि समाजमंदिर बांधकाम अशा महत्त्वपूर्ण विकासकामांचा समावेश आहे.

आंचलगाव, बोलकी, ब्राह्मणगाव, काकडी, कुंभारी, करंजी, कोळपेवाडी, कासली, चासनळी, चांदेकसारे, देर्डे कोऱ्हाळे, धामोरी, धोत्रे, धारणगाव, तळेगाव मळे, मनेगाव, मढी बुद्रुक, मंजूर, मळेगाव थडी, जवळके, जेऊर कुंभारी, सुरेगाव, शिंगणापूर, वेस-सोयगाव, डाऊच बुद्रुक, रवंदे, टाकळी, कोळगाव थडी, वेळापूर आदी गावांमधील वस्त्यांना या कामांचा लाभ मिळणार आहे.

श्रीगोंद्यात विशेष लोकअदालतीत १२ प्रकरणे निकाली; ३६ लाखांची तडजोड

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांचा भार कमी करण्यासह पक्षकारांचा वेळ, पैसा आणि मानसिक त्रास वाचविण्याच्या उद्देशाने श्रीगोंदा येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय तसेच दिवाणी न्यायालयात परक्राम्य संलेख अधिनियम १८८१ च्या कलम १३८ अंतर्गत विशेष लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. या लोकअदालतीत सुनावणीसाठी ठेवण्यात आलेल्या ५० प्रकरणांपैकी १२ प्रकरणे आपसी सामंजस्याने निकाली काढण्यात आली. या प्रकरणांमध्ये एकूण ३६ लाख १२ हजार २५९ रुपयांची तडजोड झाली. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अहिल्यानगर यांच्या मार्गदर्शनाखाली या विशेष लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते.

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर एस. एस. पारखले यांनी अधिकाधिक प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यासाठी विशेष प्रयत्न केले. या लोकअदालतीमुळे संबंधित बँका आणि पतसंस्थांना थकीत रकमेच्या वसुलीबाबत दिलासा मिळाला, तर पक्षकारांनाही दीर्घकाळ चालणाऱ्या न्यायालयीन प्रक्रियेतून मुक्तता मिळाली. संबंधित प्रकरणांतील पक्षकार आणि विधिज्ञांनी सक्रिय सहभाग नोंदवून आपापसातील वाद तडजोडीने मिटविण्यास सहकार्य केले. न्यायालयाच्या वारंवार फेऱ्या, वेळेचा अपव्यय आणि आर्थिक खर्च टाळून एकाच प्रक्रियेत वाद मिटविण्याची संधी लोकअदालतीमुळे पक्षकारांना मिळाली. सामंजस्यातून दोन्ही बाजूंना समाधान मिळवून देणे, हेच लोकअदालतीचे खरे यश असल्याचे मत न्यायाधीश एस. एस. पारखले यांनी व्यक्त केले. लोकअदालतीच्या यशस्वी आयोजनासाठी श्रीगोंदा वकील संघाचे पदाधिकारी व सदस्य, तालुका विधी सेवा समितीचे कर्मचारी, न्यायालयीन कर्मचारी आणि अन्य घटकांनी सहकार्य केले.

विकासकामे रखडविणाऱ्यांनी टीका करण्यापेक्षा आत्मपरीक्षण करावे : खरात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



कोपरगाव : शहरातील प्रलंबित विकासकामांना गती देत नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम नगराध्यक्ष पराग संधान यांच्या नेतृत्वाखाली नगरपरिषदेकडून सुरू आहे. मात्र, विकासकामे प्रत्यक्ष मार्गी लागत असल्याचे पाहून विरोधकांच्या पोटात गोळा उठला असून, त्यांनी टीका करण्यापेक्षा स्वतःच्या कार्यकाळातील कामांचे आत्मपरीक्षण करावे, असा टोला कोल्हे गटाचे राहुल खरात यांनी काळे गटाला लगावला. नगरपरिषदेच्या नागरी दलितेतर वस्ती सुधारणा योजनेंतर्गत प्रभाग क्रमांक १ मधील आर. जे. भागवत घर ते ज्ञानेश्वर घर ते पत्रकार मुबीन खान घर, खडकी रोड या रस्त्याच्या काँक्रिटीकरणासाठी २६ लाख ६२ हजार ५०० रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. शुक्रवार, दि. २० नोव्हेंबर रोजी नगराध्यक्ष पराग संधान यांच्या हस्ते या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. अनेक दिवसांपासूनची नागरिकांची मागणी पूर्ण होत असताना विरोधकांकडून राजकीय आकसातून टीका केली जात असल्याचे खरात यांनी सांगितले. आमदार आशुतोष काळे यांच्या कार्यकाळात निधी उपलब्ध असूनही रस्त्यांची कामे वेळेत झाली नाहीत. त्यामुळे नागरिकांना दोन-तीन वर्षे गैरसोयींचा सामना करावा लागला. आता हीच कामे मार्गी लागत असल्याने विरोधक अस्वस्थ झाले आहेत. त्यांनी आरोप करण्याऐवजी आपल्या कार्यकाळातील कामांचा हिशेब जनतेसमोर मांडावा, असे आव्हान खरात यांनी दिले. दरम्यान, शहरातील अतिक्रमित घरांचा प्रश्न नियमाकुल करण्याचे आश्वासन आमदार विवेकभैय्या कोल्हे व नगराध्यक्ष पराग संधान यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून पूर्ण केले असून, नागरिकांना दिलासा दिला आहे. नगरपरिषदेचा कारभार जनतेच्या पसंतीस उतरत असताना विरोधकांनी विकासकामांना सहकार्य करावे, असेही खरात यांनी स्पष्ट केले.

आदिवासी आश्रमशाळेतील आर्थिक व्यवहारांवर प्रश्नचिन्ह; चौकशीची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

नाशिक : नाशिक जिल्ह्यातील शासकीय आदिवासी आश्रमशाळेच्या आर्थिक व्यवहारांमध्ये अनियमितता झाल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते मोहन शेगर यांनी केला आहे. माहिती अधिकार कायद्यांतर्गत मिळालेल्या कागदपत्रांमधून निधीचा वापर, विविध कामांवरील खर्च आणि विद्यार्थ्यांसाठी करण्यात आलेल्या खरेदीबाबत काही संशयास्पद बाबी समोर आल्याचा दावा त्यांनी केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी आदिवासी विकास आयुक्तांकडे केली आहे.

शासनाकडून आदिवासी आश्रमशाळांना विद्यार्थ्यांच्या शिक्षण, निवास, भोजन, आरोग्य आणि इतर मूलभूत सुविधांसाठी निधी उपलब्ध करून दिला जातो. मात्र, संबंधित आश्रमशाळेत या निधीचा प्रत्यक्षात योग्य वापर झाला आहे का, याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. माहिती अधिकारातून मिळालेल्या माहितीत आश्रमशाळेला प्राप्त झालेला निधी, विविध कामांवरील खर्च, विद्यार्थ्यांसाठी केलेली खरेदी आणि त्यासंबंधीच्या नोंदींचा तपशील उपलब्ध झाला आहे.

या कागदपत्रांची पाहणी केल्यानंतर काही खर्चाच्या नोंदी आणि प्रत्यक्ष परिस्थितीत तफावत असल्याचे निदर्शनास आल्याचा आरोप शेगर यांनी केला आहे. खरेदी प्रक्रिया नियमानुसार झाली आहे का, खर्चाच्या नोंदी प्रत्यक्ष कामाशी जुळतात का आणि शासकीय निधीचा विनियोग योग्य पद्धतीने झाला आहे का, याची तपासणी होणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

आश्रमशाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण, पौष्टिक आहार, स्वच्छ निवास व्यवस्था, आरोग्य सुविधा आणि शैक्षणिक साहित्य मिळणे अपेक्षित आहे. निधीच्या वापरात अनियमितता झाल्यास त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या सुविधांवर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या प्रकरणाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज व्यक्त होत आहे.

दरम्यान, संबंधित आश्रमशाळेतील आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप अद्याप अधिकृत चौकशीत सिद्ध झालेले नाहीत. त्यामुळे उपलब्ध कागदपत्रांची पडताळणी, प्रत्यक्ष कामांची पाहणी आणि आर्थिक व्यवहारांचे लेखापरीक्षण करण्यात यावे. चौकशीत दोषी आढळणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी मोहन शेगर यांनी केली आहे. आदिवासी विकास विभागाच्या चौकशीनंतरच या प्रकरणातील वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.

निधन वार्ता

नारायण कमानदार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



नेवासा : तालुक्यातील बाभुळखेडे येथील नारायण हरीभाऊ कमानदार (वय ९०) यांचे गुरुवार दि.१९ नोव्हेंबर रोजी वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी,एक मुलगा, दोन मुली, सुन, नातवंडे असा परिवार आहे. ग्राम महसूल अधिकारी बद्रीनाथ कमानदार यांचे ते वडील होत.

चंद्रभागा ठाणगे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



पारनेर : तालुक्यातील करंदी येथील जुन्या पिढीतील आदर्श माता चंद्रभागा मंजाबा ठाणगे यांचे नुकतेच वृद्ध काळाने निधन झाले . निधना समयी वय ८० वर्षाचे होते. त्यांच्या पाठीमागे एक मुलगा, दोन मुली, नातू असा मोठा परिवार आहे. जिल्हा फेडरेशनचे माजी अध्यक्ष संभाजी गायकवाड यांच्या बहिण, हत्तरखिंडीचे सरपंच महेंद्र गायकवाड यांच्या आत्या तर मळगंगा देवस्थानचे अध्यक्ष लखन ठाणगे यांच्या त्या आजी होत्या.

माधुरी बाजार डे	माधुरी बाजार नाईट
१२४	२४६
७३	२२
६७०	३३६

संजीवनीच्या चार प्राध्यापकांची इंटरनॅशनल पोस्ट डॉक्टरेट रिसर्च फेलोशिपमध्ये झेप!



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

कोपरगांव : संजीवनी इंजिनिअरींग कॉलेज आणि संजीवनी विद्यापिठाच्या चार प्राध्यापकांनी इंटरनॅशनल पोस्ट डॉक्टरेट रिसर्च फेलोशीप पूर्ण केली. त्यामुळे संजीवनीने शैक्षणीक आणि संशोधन क्षेत्रात आपणी नवी ओळख निर्माण केली. संजीवनी विद्यापिठाचे प्रेसिडेंट अमित कोल्हे यांनी या प्राध्यापकांचा सत्कार केला आणि त्यांच्या यापुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

संजीवनीचे प्राध्यापक डॉ. एस. आर. देशमुख, डॉ. ए. व्ही. ब्राह्मणे आणि डॉ. एम. व्ही. कुलकर्णी यांनी सिंगापूरचे प्रसिध्द सरकारी विद्यापीठ 'सिंगापुर इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी' येथून पोस्ट डॉक्टरेट रिसर्च फेलोशिप पूर्ण केली. तर डॉ. एम. बी. गवळी यांनी अमेरिकेतील प्रतिष्ठित 'युनिव्हर्सिटी ऑफ डेलावेअर' येथून ही फेलोशिप पूर्ण केली.

याबाबत माहिती देताना संजीवनी विद्यापीठाचे प्रेसिडेंट श्री अमित कोल्हे म्हणाले, पोस्ट डॉक्टरेट रिसर्च फेलोशिप ही पीएच.डी. पदवीनंतर संशोधन क्षेत्रात अधिक उच्चस्तरीय प्रावीण्य मिळविण्याची महत्त्वपूर्ण संधी असते. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संशोधन पद्धती, अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्ण संशोधन संकल्पनांचा प्रत्यक्ष अनुभव त्यातून मिळतो. आंतरराष्ट्रीय विद्यापीठांसोबत संशोधन विषयक सहकार्य, संयुक्त संशोधन प्रकल्प, आंतरराष्ट्रीय दर्जाची संशोधनपत्रे आणि पेटंट निर्मितीला त्यातून चालना मिळते.

या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री नितीनदादा कोल्हे यांनी या प्राध्यापकांचे अभिनंदन केले. यावेळी संजीवनी विद्यापीठाचे व्हाईस चांसलर डॉ. ए. जी. ठाकूर, रजिस्ट्रार डॉ. अमोल ढाकणे, संजीवनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे अधिष्ठाता (शैक्षणिक) डॉ. ए. बी. पवार आणि स्थापत्य व संरचनात्मक अभियांत्रिकी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. ए. एस. सय्यद आदि उपस्थित होते.

शुभ लाभ

Date	Mon		Tue		Wed		Thu		Fri	
09/02/2026 to 13/02/2026	3 7 8	82	7 7 8	93	1 5 7	6 7 9	22	5 7 0	1 3 9	34	4 0 0	6 8 9	30	1 4 5
16/02/2026 to 20/02/2026	3 4 7	46	3 5 8	29	5 6 8	7 7 9	38	2 3 3	1 2 6	92	2 4 6	1 2 3	65	4 5 6
23/02/2026 to 27/02/2026	2 5 0	76	4 5 7	39	4 6 9	2 6 6	48	1 7 0	1 6 8	53	5 8 0	1 4 5	09	5 6 8
02/03/2026 to 06/03/2026	1 3 0	47	2 6 9	03	2 4 7	* * *	**	* * *	2 5 7	48	2 7 9	4 6 6	65	2 4 9
09/03/2026 to 13/03/2026	2 3 6	16	2 4 0	56	8 8 0	5 7 8	05	8 8 9	2 4 8	43	1 4 8	3 3 4	09	1 3 5
16/03/2026 to 20/03/2026	4 5 6	56	8 9 9	21	3 8 0	4 6 0	02	4 9 9	1 2 7	02	1 3 8	6 7 0	38	3 7 8
23/03/2026 to 27/03/2026	6 8 9	34	3 5 6	46	1 7 8	5 6 9	03	7 8 8	1 3 0	46	2 4 0	3 3 0	64	1 6 7
30/03/2026 to 03/04/2026	2 8 9	90	1 3 6	87	1 6 0	2 7 0	97	2 7 8	1 1 9	12	1 5 6	1 6 9	66	2 5 9
06/04/2026 to 10/04/2026	1 3 3	70	2 2 6	02	7 7 8	1 3 5	98	4 7 7	3 5 0	82	1 5 6	1 2 4	78	4 6 8
13/04/2026 to 17/04/2026	5 6 9	06	1 5 0	43	6 7 0	2 3 9	45	5 0 0	1 3 3	77	8 9 0	2 6 0	85	1 4 0
20/04/2026 to 24/04/2026	5 7 8	00	1 2 7	58	4 5 9	1 2 2	53	3 5 5	5 5 7	71	3 8 0	3 4 9	68	3 7 8
27/04/2026 to 01/05/2026	3 5 8	63	1 4 0	85	7 8 0	1 6 0	71	1 2 8	6 7 9	29	1 9 9	6 8 8	27	2 5 0
04/05/2026 to 08/05/2026	1 7 9	71	3 9 9	34	6 8 0	2 3 9	48	2 7 9	2 4 6	25	2 5 8	2 4 0	66	2 5 9
11/05/2026 to 15/05/2026	5 6 6	79	2 7 0	04	2 3 9									

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

नशिबाची परिक्षा

रविवार, दि.२२ नोव्हेंबर २०२६

मिलनम डे

उदय-अस्त: २५८ ३६४ ९२५ — ६-२ — ४९५ १५६ १५४

सिंगल ५-१-९ मजबुत

जोड ७०-४६-३१ २५-६९

कल्याण

उदय-अस्त: ४९३ ५९१ २५६ — ३-५ — ७५३ ४८२ १०२

सिंगल ९-४-५ मजबुत

जोड ०७-१३-२६-८९-३४

मुंबैम (मेन)

उदय-अस्त: ९२३ ४२९ १०५ — ९-१ — १७६ २२९ ३५६

सिंगल ४-७-९ मजबुत

जोड २०-८४-५१-७९-४३

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

द•ख•ल



सरस्वती विद्यालयात 'डेंग्यूमुक्त अहिल्यानगर' अभियानाचा १४ वा आठवडा उत्साहात साजरा

अहिल्यानगर : शहर डेंग्यूमुक्त करण्याच्या उद्देशाने अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'डेंग्यूमुक्त अहिल्यानगर' साप्ताहिक उपक्रमाच्या १४ व्या आठवड्याचा कार्यक्रम केडगाव येथील सरस्वती प्राथमिक व माध्यमिक विद्या मंदिर, देवी रोड, प्रभाग क्रमांक १७ येथे उत्साहात पार पडला. या उपक्रमाला अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीप भोर यांनी केले. त्यांनी शाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता, आरोग्य आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याचे महत्त्व सांगितले. डेंग्यूमुक्त शहरासाठी प्रत्येक नागरिकाने आपल्या घरापासून स्वच्छतेची सुरुवात करावी, असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी डेंग्यू प्रतिबंध या विषयावर आकर्षक जनजागृतीपर नाटिका सादर केली. या नाटिकेतून डासांची उत्पत्ती कशी होते, डेंग्यूचा प्रसार कसा रोखता येतो आणि नागरिकांनी कोणती काळजी घ्यावी, याचे सादरीकरण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमातून उपस्थितांना स्वच्छता आणि आरोग्याचा महत्त्वपूर्ण संदेश मिळाला. महानगरपालिकेचे उपायुक्त हरिकल्याण येलगट्टे यांनी आपल्या भाषणात डेंग्यू आजाराची कारणे आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांची माहिती दिली.

मढी येथे रविवारी जिल्हास्तरीय क्रॉस कंट्री अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन

अहिल्यानगर : अहिल्यानगर जिल्हा थलेटिक्स असोसिएशन, अहिल्यानगर आणि शिवछत्रपती करिअर अकॅडमी पाथर्डी (भरती पूर्व प्रशिक्षण केंद्र) यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय क्रॉस कंट्री अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा रविवार, दिनांक ६ डिसेंबर २०२६ रोजी सकाळी ८:३० वाजता श्री क्षेत्र मढी येथे (मढी-पाथर्डी रोड) पार पडणार आहे. या स्पर्धे तून आगामी राज्य क्रॉस कंट्री स्पर्धेसाठी अहिल्यानगर जिल्ह्याचा संघ निवडण्यात येणार आहे. पुढील राज्यस्तरीय क्रॉस कंट्री स्पर्धा दिनांक २५ व २६ डिसेंबर २०२६ रोजी उमरगा (जि. धाराशिव) येथे होणार आहे. जिल्हास्तरीय स्पर्धेतील प्रत्येक गटातील प्रथम तीन क्रमांकाच्या विजेत्यांना गुणवत्ता प्रमाणपत्र व मेडल देऊन गौरविण्यात येणार आहे. ही स्पर्धा केवळ अहिल्यानगर जिल्ह्यातील खेळाडूंसाठीच मर्यादित असून १४ वर्षांखालील खेळाडूंना यात सहभागी होता येणार नाही. खेळाडूंची नाव नोंदणी स्पर्धेच्या ठिकाणी सकाळी ८:०० वाजता केली जाणार आहे. सर्व खेळाडूंनी आपला मूळ (ओरिजनल) जन्म दाखला व आधार कार्ड सोबत आणणे बंधनकारक आहे. तसेच, राज्य स्पर्धेत खेळण्यासाठी प्रत्येक खेळाडूने आपला नंबर' काढणे आवश्यक आहे.

भगवानगड परिसराला जायकवाडीचे पाणी मिळावे

यासाठी प्रल्हाद किर्तने यांचे बेमुदत उपोषण सुरू

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

खरवंडी कासार : भगवानगडाच्या पायथ्याशी असलेल्या सर्व गावांना जायकवडी प्रकल्पाचे पाणी मिळावे, या मागणीसाठी प्रल्हाद किर्तने यांनी आज दि. २१ नोव्हेंबर २०२६ पासून बेमुदत आमरण उपोषण खरवंडी कासार येथे सुरू केले आहे.

भगवानगड परिसरातील गावांना पाणी उपलब्ध व्हावे, शेती व ग्रामस्थांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागावा, यासाठी जायकवडी प्रकल्पाचे पाणी या भागातील गावांना देण्यात यावे, अशी मागणी किर्तने यांनी केली आहे.

भगवानगडाच्या पायथ्याशी असलेल्या अनेक गावांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून, पाण्याच्या प्रश्नावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज आहे. जायकवडी प्रकल्पाचे पाणी परिसरातील गावांना मिळाल्यास शेतकरी, ग्रामस्थ तसेच जनावरांच्या पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटण्यास मदत होईल, अशी भूमिका उपोषणकर्त्यांनी मांडली आहे.

दरम्यान, उपोषण स्थळी ताजनापूर मध्यम प्रकल्प उपविभाग, शेवगावचे उपविभागीय अधिकारी श्रीहरी कुलकर्णी यांनी भेट देऊन उपोषणकर्त्यांशी संवाद साधला. ताजनापूर प्रकल्पाचे उरलेले पाणी भगवानगड



परिसरातील गावांना देऊ शकतो, यासाठी आम्ही सर्वे क्षण करणार आहोत व त्याची मंजुरी लवकर मिळवून तुम्हाला पाणी देऊ, असे आश्वासन त्यांनी दिले. उपोषण मागे घ्यावे, अशी विनंती त्यांनी केली.

मात्र, लेखी आश्वासन दिल्याशिवाय व कलेक्टर साहेब व आमदार मॅडम आल्याशिवाय मी उपोषण सोडणार नाही, असा स्पष्ट नकार उपोषणकर्ते प्रल्हाद किर्तने यांनी दिला. भगवानगड गावासाठी स्वतंत्र योजना हवी, अशीही त्यांची ठाम मागणी आहे.

या आंदोलनाला परिसरातील गावकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. शासन व प्रशासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन ठोस निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

भगवानगड परिसराला जायकवडीचे पाणी मिळावे; यासाठी खरवंडी कासार येथे प्रल्हाद किर्तने यांचे बेमुदत आमरण उपोषण सुरू

नवव्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी ॲड. राजेश कावरे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : ग्रामीण भागातील साहित्यिक, कवी, लेखक आणि नवोदित प्रतिभावंतांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथील परिवार मंगल कार्यालयात मंगळवार, दि. २४ नोव्हेंबर रोजी नवव्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने हे संमेलन पार पडणार आहे. या संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी ज्येष्ठ विधीज्ञ ड. राजेश कावरे यांची निवड करण्यात आली आहे.

संमेलनासाठी लेखक, नाशिक येथील चित्रपट निर्माता व दिग्दर्शक सुनील मोंढे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच प्रमुख व प्रेरक वक्ते आणि सामाजिक कार्यकर्ते अमोद नलगे यांचीही विशेष उपस्थिती लाभणार आहे. संमेलनाच्या माध्यमातून ग्रामीण साहित्य, सामाजिक जाणीव, सांस्कृतिक परंपरा आणि नव्या पिढीतील साहित्यिकांच्या अभिव्यक्तीला प्रोत्साहन देण्याचा



प्रयत्न करण्यात येणार आहे. अशी माहिती संमेलनाचे संयोजक पै. नाना डोंगरे यांनी दिली.

ग्रामीण भागात अनेक प्रतिभावंत लेखक, कवी आणि साहित्यिक आपल्या लेखणीच्या माध्यमातून समाजातील वास्तव, प्रश्न, संघर्ष, ग्रामीण संस्कृती आणि मानवी संवेदनांचे दर्शन घडवत असतात. मात्र, त्यांना आपले साहित्य सादर करण्यासाठी आणि विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी पुरेशी व्यासपीठे उपलब्ध होत नाहीत. ही उणीव भरून काढण्याबरोबरच ग्रामीण भागातील साहित्यिक चळवळीला व्यापक स्वरूप देण्याच्या हेतूने या संमेलनाची परंपरा जपली जात आहे. आयोजित करण्यात येणारे हे नववे संमेलन ग्रामीण साहित्यप्रेमींसाठी महत्त्वपूर्ण पर्व ठरणार आहे.

या संमेलनाचे विशेष आकर्षण म्हणजे विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करून समाजासमोर आदर्श निर्माण करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा विशेष पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे.

आध्यात्मिक सेंटरमध्ये बालकाचा वाढदिवस साजरा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



पारनेर : आजच्या काळात वाढदिवस म्हटले की मोठा खर्च, आकर्षक सजावट, केक, रोषणाई आणि धूमधडाका असे चित्र पाहायला मिळते. मात्र या सर्व गोष्टींना फाटा देत सामाजिक भान आणि आध्यात्मिक संस्कारांची जपणूक करण्याचा आदर्श पारनेर शहरातील नरसाळे कुटुंबीयांनी समाजासमोर ठेवला आहे.

पारनेर शहरातील यशराज अमोल नरसाळे या बालकाचा पहिला वाढदिवस सध्या राज्यात जाणवत असलेल्या दुष्काळी परिस्थितीचे भान ठेवून अत्यंत साध्या आणि आध्यात्मिक वातावरणात साजरा करण्यात आला. ईश्वरीय विश्व विद्यालय, पारनेर सेंटर येथे हा वाढदिवस उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च करण्याऐवजी आध्यात्मिक वातावरणात आनंदाचे क्षण साजरे करण्याचा निर्णय नरसाळे कुटुंबीयांनी घेतला. या उपक्रमातून समाजाला साधेपणा, सामाजिक संवेदनशीलता आणि आध्यात्मिक जीवनमूल्यांचा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला.

यावेळी ईश्वरीय विश्व विद्यालय पारनेर सेंटरच्या संचालिका ब्रह्माकुमारी साधना दीदी, मीरा पुजारी, पत्रकार भगवान गायकवाड , अजिनाथ ढेरे, अमोल नरसाळे, विशाल गोरडे, सिंधू गाडगे, मयुरी गाडगे, माधुरी नरसाळे आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी उपस्थित मान्यवरांनी बालकाला वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. बालपणापासूनच मुलांवर चांगले संस्कार व्हावेत, त्यांना प्रेम, शांती, समाधान, नम्रता आणि परोपकार यांसारख्या मूल्यांची ओळख व्हावी, यासाठी अशा आध्यात्मिक वातावरणातील उपक्रमांचे विशेष महत्त्व असल्याचे यावेळी अधोरेखित झाले. वाढदिवस हा केवळ आनंदोत्सव नसून जीवनात चांगल्या विचारांची आणि संस्कारांची पेरणी करण्याची संधी आहे, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. दुष्काळी परिस्थितीत गरज नसलेल्या खर्चाला आळा घालून साधेपणाने आनंद साजरा करण्याचा नरसाळे कुटुंबीयांचा हा उपक्रम निश्चितच समाजासाठी प्रेरणादायी ठरणारा आहे.

राशीन बसस्थानकातील धुळीच्या साम्राज्या

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



राशीन : राशीन येथील एसटी बसस्थानक परिसरात सध्या धुळीचे साम्राज्य निर्माण झाले असून, प्रवाशांना मोठ्या प्रमाणात धुळीचा त्रास सहन करावा लागत आहे. बसस्थानकात येणाऱ्या-जाणाऱ्या एसटी बसच्या सततच्या वर्दळीमुळे धुळीचे लोट उडत असून, बसची प्रतीक्षा करणारे विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य प्रवाशांच्या आरोग्याचा गंभीर आजाराचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या गंभीर समस्येकडे एसटी प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी शिवसेना राशीन शहरप्रमुख नाझीम भाई काझी यांनी केली आहे.

राशीन बसस्थानक हे परिसरातील अनेक गावांसाठी महत्त्वाचे प्रवासी केंद्र आहे. दररोज शेकडो प्रवासी या बसस्थानकातून प्रवास करतात. मात्र, बसस्थानक परिसरात उडणाऱ्या धुळीमुळे प्रवाशांना बसची वाट पाहणेही कठीण झाले आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि श्वसनाचे त्रास असलेल्या व्यक्तींना या धुळीचा अधिक त्रास होण्याची शक्यता आहे. बसस्थानकातील स्वच्छता आणि प्रवाशांच्या आरोग्याच्या दृष्टीने ही बाब अत्यंत चिंताजनक आहे.

प्रवाशांच्या आरोग्याशी खेळ नको; प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात!

बसस्थानक परिसरात नियमित पाणी फवारणी करावी, दररोज स्वच्छता राखावी, धूळ उडण्यास प्रतिबंध करणाऱ्या उपाययोजना कराव्यात तसेच आवश्यक त्या ठिकाणी कायमस्वरूपी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी नाझीम भाई काझी यांनी केली आहे.

प्रवाशांना मूलभूत सुविधा आणि आरोग्यदायी वातावरण उपलब्ध करून देणे ही एसटी प्रशासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे या समस्येकडे दुर्लक्ष न करता तातडीने कार्यवाही करावी. अन्यथा या प्रश्नासाठी शिवसेनेच्या वतीने आक्रमक भूमिका घेण्यात येईल, असा इशाराही शिवसेना राशीन शहरप्रमुख नाझीम भाई काझी यांनी दिला आहे.

आता एसटी प्रशासन या समस्येची किती गांभीर्याने दखल घेते आणि प्रवाशांना धुळीच्या त्रासातून कधी दिलासा मिळतो, याकडे राशीनकरांचे लक्ष लागले आहे.

केडगावमध्ये अल्पवयीन मुलीचा विनयभंग; गुन्हा

अहिल्यानगर : शहरातील केडगाव परिसरात असलेल्या पिंकसिटी जवळ अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याची गंभीर घटना समोर आली आहे. ही घटना १६ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ६ वाजण्याच्या सुमारास घडली असून कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात पारनेर तालुक्यातील कळमकरवाडी येथील रहिवासी विक्रमसिंह बबनराव कळमकर याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. फिर्यादी या ३३ वर्षीय घरकाम करणाऱ्या महिला असून त्या पारनेर तालुक्यातील रहिवासी आहेत. घटनेच्या वेळी फिर्यादीची अल्पवयीन मुलगी घरात एकटीच असल्याची माहिती आरोपीला होती. या संधीचा फायदा घेत आरोपी विक्रमसिंह बबनराव कळमकर याने राहत्या घरात प्रवेश केला. आरोपीने पीडित अल्पवयीन मुलीशी अश्लील वर्तन करून तिचे ओठ व गालावर मुके घेत तिचा विनयभंग केला. तसेच या प्रकाराबद्दल कोणालाही काही सांगू नये, असा धमकीचा इशारा आरोपीने पीडितेला दिला.

जनतेच्या विश्वासाची विकासकामांतून परतफेड करणार : आ. दाते

पळशी गावासाठी ३२५ लाखांच्या विकासकामांचे भूमिपूजन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



पारनेर : पळशी गावाच्या विकासासाठी आमदार काशिनाथ दाते यांच्या विशेष प्रयत्नातून मंजूर झालेल्या ३२५ लाख रुपयांच्या दोन विकासकामांचे भूमिपूजन शनिवारी (दि. २१) उत्साहात पार पडले. यामध्ये पळशी-वनकुटे रस्त्यावर लहान पुलाच्या बांधकामासाठी ३०० लाख, तर श्री विठ्ठल मंदिर देवस्थान येथे भक्तनिवास उभारण्यासाठी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

यावेळी बोलताना आ. दाते म्हणाले, निवडणुकीतील मतदानाचा विचार न करता प्रत्येक गावाच्या विकासाला प्राधान्य देणे ही आपली भूमिका आहे. जनतेने दाखविलेल्या विश्वासाची परतफेड विकासकामांच्या माध्यमातून करणार असून, राजकारणापेक्षा जनहिताला आपण नेहमीच महत्त्व दिले आहे. आमदार झाल्यापासून पळशी गावासाठी जवळपास सव्वापाच कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे.

कै. वसंतराव झावरे दादांच्या सहवासातून सामाजिक व राजकीय कार्याची शिकवण मिळाली. त्यांचे विचार केवळ बोलण्यातून नव्हे, तर कृतीतून जपणे महत्त्वाचे आहे, असेही त्यांनी नमूद केले.

या भूमिपूजन सोहळ्यास तालुकाध्यक्ष वसंतराव चेडे, प्रशांत दादा गायकवाड, बाबासाहेब खिलारी, संदीप रोहोकले, सुभाष दुधाडे, डॉ. नितीन रांधवण यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कमिन्स इंडियाच्या सीएसआर निधीतून गांगर्डा येथे आधुनिक ज्ञानमंदिराची वास्तू

राणीताई लंके व प्रमोद वैद्य यांच्या हस्ते इमारतीचा लोकार्पण सोहळा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पारनेर : गावाचा विकास केवळ शासकीय निधीवर अवलंबून नसतो, तर त्यासाठी प्रामाणिक नेतृत्व, सामाजिक बांधिलकी, सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि ग्रामस्थांची एकजूटही तितकीच महत्त्वाची असते, याचा प्रत्यय पारनेर तालुक्यातील भोयरे गांगर्डा येथे आला आहे. कमिन्स इंडिया फाउंडेशनच्या सीएसआर निधीतून, ऐक्य सेवा सेंटरच्या माध्यमातून आणि ग्रामस्थांच्या भरीव लोकसहभागातून उभारण्यात आलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या नूतन, सुसज्ज आणि आधुनिक सुविधांनी परिपूर्ण इमारतीचा लोकार्पण सोहळा शुक्रवार, दि. २० नोव्हेंबर २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य राणीताई निलेश लंके यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सोहळ्याला कमिन्स इंडिया आणि सीजीटी इंडियाचे वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी, शिक्षण क्षेत्रातील मान्यवर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



या कार्यक्रमाला सीजीटी इंडियाचे डायरेक्टर अँड बिझनेस लीडर मा. श्री. प्रमोद वैद्य, सीजीटी इंडियाचे ऑपरेशन्स लीडर श्री. राकेश भोसले, कमिन्स इंडियाचे सीनियर जनरल मॅनेजर कॉर्पोरेट रिस्पॉन्सिबिलिटी श्री. अमित लेले, सीजीटी प्लांट लीडर श्रीमती कविता भारंबे, सीनियर एचआर मॅनेजर श्री. अमोल साबळे, एचआर मॅनेजर श्री. तुषार जोशी, एक्झिक्युटिव्ह मॅनेजर श्री. विकास साळवे, श्री. राकेश पाल, श्री. संदीप क्षीरसागर, श्री. दीपक बेट्टी, श्री. अंकित वर्मा आदी मान्यवर उपस्थित होते. ऐक्य सेवा सेंटरचे अध्यक्ष श्री. तुकाराम वाखारे यांनी आपल्या मनोगतात कमिन्स इंडिया कंपनीच्या सीएसआर निधीतून शाळेसाठी सहकार्य उपलब्ध करून दिल्याबद्दल कंपनीच्या सर्व अधिकाऱ्यांचे ऋण व्यक्त केले. भविष्यातही पारनेर तालुक्यातील इतर गावांमध्ये शाळांच्या उभारणीसाठी कंपनीने सहकार्य करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. तसेच तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता विविध गावांमध्ये जलसंधारणाच्या कामांसाठीही कमिन्स इंडियाने सीएसआर निधीतून मदत करावी, अशी मागणी त्यांनी केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा, सौ.राणीताई निलेश लंके यांनी अध्यक्षीय मनोगतात शाळेच्या दर्जेदार इमारतीचे आणि उपलब्ध सुविधांचे कौतुक केले. कमिन्स इंडिया, ऐक्य सेवा सेंटर व ग्रामस्थांच्या एकत्रित सहकार्यातून ग्रामीण भागात एवढी सुंदर वास्तू उभी राहणे ही अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास सरपंच सचिन आप्पा पठारे, सरपंच शिवाजी शिंदे, सरपंच वीरेंद्र लटांबळे, लाला भोंडवे, सरपंच प्रकाश गुंड, सरपंच मच्छिंद्र दिवटे, सरपंच गोरख दरेकर, सरपंच मनोज मुंगसे, अरुण काटे, कारभारी बाबर, सूर्यकांत काळे, सरपंच रोहिणी गांगड-केकडे, उपसरपंच आदिनाथ गायकवाड, चेअरमन अर्जुनराव रसाळ, व्हाइस चेअरमन सचिन रसाळ, शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष ऋषाली रसाळ, भाऊसाहेब भोगाडे, मोहन पवार, युवराज डोंगरे, रवींद्र भोगाडे यांच्यासह परिसरातील विविध संस्थांचे पदाधिकारी, शिक्षक संघटनांचे प्रतिनिधी, पळवे केंद्रातील शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, महिला, मा.चेअरमन माणिक पवार, व्हा चेअरमन विजय कामठे,मा. चेअरमन अशोकराव पवार, व्हा. चेअरमन प्रशांत रसाळ, मा.चेअरमन दादासाहेब रसाळ, मा. सरपंच भाऊसाहेब भोगाडे, व्हा. चेअरमन सुभाष भोगाडे,मा. उपसरपंच संजय पवार,गणेश सातपुते सदस्य ,शिवाजी रसाळ, अर्जुन गांगड, बाळासाहेब सातपुते, श्रीराम लगड, जालिंदर पवार,राजु पाटील डोंगरे ,मेजर शरद पवार, मेजर आप्पा पवार, सुभाष पवार युवराज रसाळ,शुभम गायकवाड, अर्जुन डोंगरे,दत्ता कामठे,शेखर पवार,अक्षय पवार,उमेश पवार, संपत पाडळे, किरण भोगाडे,बापू भोगाडे,मनोज पवार, ऋषी पवार, मिलिंद रसाळ, ज्ञानदेव केकडे, मंगेश सातपुते,सोमनाथ तरटे, गौरी सातपुते,, जान्हवी पवार,यांच्यासह व शिक्षक संघटनेचे सर्व प्रतिनिधी, युवक आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

दखल

दापोडी ते केडगाव टोलनाका रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य

किरकोळ अपघातांच्या घटनांत वाढ



केडगाव : दापोडी (ता. दौंड) येथील दापोडी ते केडगाव टोलनाका या रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्त्याची दुरवस्था झाली असून, खड्ड्यांमुळे अनेक किरकोळ अपघात घडले आहेत. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे.या रस्त्यावरून दररोज दुचाकी, चारचाकी तसेच अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असते. मात्र, रस्त्यावर पडलेले खड्डे आणि उखडलेले डांबरीकरण यामुळे वाहन चालवताना चालकांना कसरत करावी लागत आहे. विशेषतः दुचाकीस्वारांना खड्ड्यांचा अंदाज न आल्यास अपघाताचा धोका निर्माण होत आहे.रस्त्याच्या दुरवस्थेमुळे वाहनांचेही नुकसान होत असून, रात्रीच्या वेळी खड्डे स्पष्ट दिसत नसल्याने परिस्थिती अधिक धोकादायक बनत आहे. संबंधित सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा रस्त्याची देखभाल करणाऱ्या यंत्रणेने या समस्येकडे तातडीने लक्ष देऊन रस्त्याची पाहणी करावी आणि खड्डे बुजवून रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी वाहनचालक व स्थानिक नागरिकांकडून होत आहे.मोठ्या अपघाताची वाट न पाहता संबंधित प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.

दुष्काळग्रस्त बांधवांच्या मदतीसाठी नगरसेविका रूपाली धाडवे यांच्याकडून एक लाखांची मदत



पुणे : केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री तथा पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांच्या वाढदिवसानिमित्त दुष्काळग्रस्त बांधवांच्या मदतीसाठी करण्यात आलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत पुणे महापालिकेच्या स्थायी समिती सदस्या व नगरसेविका रूपाली दिनेश धाडवे यांनी एक लाख रुपयांची आर्थिक मदत दिली. या मदतीचा धनादेश त्यांनी मुरलीधर मोहोळ यांच्याकडे सुपूर्द केला.वाढदिवस साजरा करताना सामाजिक बांधिलकी जपत गरजू आणि दुष्काळग्रस्त बांधवांना मदतीचा हात देण्याचा उपक्रम स्तुत्य असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले. मदतीचा धनादेश सुपूर्द केल्यानंतर रूपाली धाडवे यांनी मोहोळ यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. यावेळी माजी नगरसेवक दिनेश ऊर्फ पिंटूभाऊ धाडवे, सहकारी नगरसेवक बाळाभाऊ ओसवाल, राजेंद्र आबा शिळीम कर, श्रीकांत भाई गायकवाड, बारामती जिल्हाध्यक्ष शेखर वडणे आणि विठ्ठल वरुडे पाटील उपस्थित होते.

ज्वारी, हरभरा बियाणाचा कृषी विभागाकडून मोफत पुरवठा

ज्वारीचे १० हजार व हरभराचे २ हजार एकर क्षेत्रासाठी मोफत बियाणे मिनीकिट वाटप करण्यात येणार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणे : पुणे जिल्ह्यात कृषी विभागाकडून जिल्ह्यातील १३ तालुक्यातील शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा पोषण अभियान योजनेअंतर्गत ज्वारी पिकाच्या फुले यशोमती या वाणाचे १९ हजार ७५५ एकर क्षेत्रासाठी मोफत बियाणे पुरवठा करण्यात आला आहे. बियाणे वाटप करण्यात आलेल्या बहुतांश ठिकाणी पेरणी पूर्ण झाली आहे.

चालू वर्षी दुष्काळी परिस्थिती असल्याम ुळे जनावरांच्या चाऱ्याचा मोठा प्रश्न निर्माण होऊ शकतो या पार्श्वभूमीवर कृषी विभागाकडून मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना मोफत बियाणे पुरवठा करण्यात आला आहे. यामुळे रब्बी हंगामात विहिरी, कॅनॉल, तलाव बोअरवेल या ठिकाणी पाणी उपलब्ध होऊ शकते अशा ठिकाणी ज्वारी पिकाची पेरणी केल्यानंतर त्यास २ ते ३ संरक्षित पाणी मिळाले तर ज्वारीचे धान्याचे उत्पादन होईल तसेच जनावरांसाठी मोठ्या प्रमाणात कडबा उपलब्ध होईल, यामुळे चारा टंचाईचा प्रश्न देखील निकाली निघू शकतो.

शेतकऱ्यांना अजून १० हजार एकर क्षेत्रावर मोफत बियाणाचा पुरवठा करण्याचे नियोजन कृषी विभागाकडून सुरू असून, सदर बियाणे येत्या २ ते ३ दिवसात शेतकऱ्यांना वाटप करण्यात येणार आहे तरी ज्या शेतकऱ्यांना ज्वारी पिकाची पेरणी करायची आहे अशा शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर मोठ्या प्रमाणात अर्ज करावेत असे आवाहन करण्यात आले आहे.

रब्बी हंगामात पुणे जिल्ह्यात हरभरा हे प्रमुख पीक आहे. हरभरा पिकास कमी प्रमाणात पाणी लागते. २ ते ३ वेळेस पाणी दिल्यास हरभरा पीकाचे उत्पादन चांगले येते व जमिनीचा पोत देखील सुधारतो. हरभरा कमी पाण्यात येणारे पीक असल्यामुळे शेतकऱ्यांचा हरभरा पिकास चालू वर्षी मोठ्या प्रम णात पसंती आहे . ज्या ठिकाणी ऊस तुटून जात आहे व उन्हाळ्यात पाण्याची कमतरता भासू शकते अशा ठिकाणी उसाचा खोडवा न राखता हरभरा पीक केल्यास, पीक फेरपालट होऊन बेवडदेखील होतो व जमिनीचा पोत सुधारण्यास मदत होते तसेच पुढील पीक चांगल्या प्रमाणात घेता येते.याकरिता चालू रब्बी हंगामात कृषी विभागाने जिल्ह्यात जवळपास ६ हजार ३२० एकर क्षेत्रासाठी हरभराचे मोफत बियाणे वाटप केले आहे. तसेच यापुढे शेतकऱ्यांच्या मागणीनुसार हरभरा बियाणाचे महाडीबीटी पोर्टलवर प्रमाणित बियाणे या घटकासाठी अर्ज न करता मि नीकिट या घटकासाठी अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वैभव तांबे यांनी केले आहे.

आंबेगाव तालुक्यात उत्पादन शुल्क विभागाचा छापा; ३ लाख ५९ हजारांचे विदेशी मद्य जप्त

- पंचायत समिती सदस्याच्या चुलत्याच्या घरात मद्यसाठा
- गाडी खराब झाल्याने मद्य घरी उतरवल्याचा खुलासा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पारगाव : आंबेगाव तालुक्यातील पोदवाडी येथील खारावस्ती परिसरात राज्य उत्पादन शुल्क विभागाने छापा टाकून ३ लाख ५९ हजार ६५० रुपये किमतीचा विदेशी मद्यसाठा जप्त केला. बुधवार (दि. १८ नोव्हेंबर) रोजी सायंकाळी ही कारवाई करण्यात आली.

या कारवाईत राजेंद्र किसन वाळुंज (वय ५१) यांच्या राहत्या घरातील खोलीत विविध ब्रँडच्या विदेशी मद्याच्या बाटल्या आणि बिअरचा साठा आढळून आला. याप्रकरणी महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.जप्त केलेल्या मद्याची एकूण किंमत ३ लाख ५९ हजार ६५० रुपये असल्याचे प्रथम खबर अहवालात नमूद आहे. या प्रकरणाचा तपास उत्पादन शुल्क विभागाचे निरीक्षक एम. एन. झेंडे करीत आहेत.दरम्यान, अनिल वाळुंज यांनी आपली बाजू मांडताना जप्त केलेले मद्य पूर्णपणे ओरिजनल असल्याचे सांगितले. हे मद्य हॉटेलवर उतरवायचे होते; मात्र गाडी खराब झाल्यामुळे ते घरी उतरवण्यात आले. हॉटेल व्यवसाय नवीन असल्याने याबाबत आम्हाला कोणत्याही प्रकारची माहिती नव्हती. यापुढे अशा चुका होणार नाहीत, अशी काळजी घेतली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.या कारवाईबाबत अधिक माहिती घेण्यासाठी उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता, त्यांनी सविस्तर माहिती देण्यास टाळाटाळ केली. या प्रकरणाच्या पुढील तपासाकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

गाडी खराब झाल्याने मद्य घरी उतरवले – अनिल वाळुंज

जप्त करण्यात आलेले मद्य पूर्णपणे ओरिजनल आहे. हे मद्य हॉटेलवर उतरवायचे होते; मात्र गाडी खराब झाल्यामुळे घरी उतरवले. आमचा हॉटेल व्यवसाय नवीन असल्यामुळे आम्हाला कोणत्याही प्रकारची माहिती नव्हती. यापुढे अशा प्रकारच्या चुका होणार नाहीत, याची काळजी घेतली जाईल, अशी प्रतिक्रिया अनिल वाळुंज यांनी दिली.

सनी जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त अनाथ मुलांना आनंदाची सहल; अजय जाधव यांचा स्तुत्य उपक्रम

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शिरूर : शिरूर ग्रामीण ग्रामपंचायतीचे सदस्य तथा सामाजिक कार्यकर्ते सनीभैय्या जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त अजय जाधव यांच्या संकल्पनेतून सामाजिक बांधिलकी जपत एक स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. शिरूर येथील द मदर ग्लोबल फाउंडेशन संचलित श्री मनःशांती छात्रालय, म ाईनगरी, शिरूर येथील अनाथ व गरजू विद्यार्थ्यांसाठी एका दिवसीय आनंददायी सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या सहलीसाठी विद्यार्थ्यांना पारनेर तालुक्यातील अळकुटी येथील ऑर्सन रिसॉर्ट येथे नेण्यात आले.

या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांसाठी विविध मनोरंजक खेळ, मनोरंजनात्मक कार्यक्रम आणि आनंददायी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच सर्व विद्यार्थ्यांसाठी अन्नदान करण्यात आले. दिवसभर विविध खेळ आणि मनोरंजनाच्या माध्यम ातून विद्यार्थ्यांनी मनसोक्त आनंद लुटला. त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य आणि उत्साहाने संपूर्ण परिसर आनंदमय झाला होता.

वाढदिवसाच्या निमित्ताने केवळ शुभेच्छा आणि सत्कारापुरते मर्यादित न राहता अनाथ मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद ठरला. समाजातील वंचित आणि गरजू घटकांना आनंदाचे काही क्षण देणे, त्यांच्यासोबत



वेळ घालवणे आणि त्यांना आपलेपणाची जाणीव करून देणे, हाच या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. अजय जाधव यांच्या कल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांकडून विशेष कौतुक करण्यात आले.

यावेळी सर्व शिक्षकवृंद, अजय जाधव, सनीभैय्या जाधव, विनय सपकाळ, सीमाताई सपकाळ, सचिन ढोरमले, लौकिक शहा यश सुर्यवंशी यांच्यासह मि त्रपरिवार उपस्थित होता.

काळेवाडीच्या निर्मयी जाधवची क्रिकेटमध्ये चमकदार कामगिरी!

४५ धावांची नाबाद खेळी; गोलंदाजीतही घेतली महत्त्वपूर्ण विकेट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



दिवे : काळेवाडी (ता. पुरंदर) येथील ११ वर्षीय कुमारी निर्मयी सचिन जाधव हिने क्रिकेटच्या मैदानावर अष्टपैलू काम गिरी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. नुकत्याच झालेल्या अंडर-१४ गटातील पनवेल क्लब विरुद्ध व्हिक्टरी क्लब साम न्यात निर्मयीने नाबाद ४५ धावांची झुंजार खेळी केली. तसेच गोलंदाजीत एक महत्त्वपूर्ण विकेट घेत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.या सामन्यात व्हिक्टरी क्लब पनवेल संघाने ४० षटकांत २६७ धावांचे आव्हान पाच विकेट्स राखून पूर्ण केले.निर्मयी वयाच्या सहाव्या वर्षापासून क्रिकेटचा सराव करत असून, सध्या ती व्हिक्टरी क्लब, मुंबई आणि बीसीसीए क्लब, बेलापूर यांच्याकडून खेळते. हाशीब खान , निलेश कोळी आणि शाहाबाद खान यांच्या मार्गदर्शनाखाली तिचे क्रिकेट प्रशिक्षण सुरू आहे.भविष्यात मुंबई अंडर-१६ संघाकडून खेळण्याचे स्वप्न निर्मयीने उराशी बाळगले असून, त्यासाठी ती कठोर मेहनत घेत आहे. तिच्या या यशाबद्दल दिवे,काळेवाडी, व परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

जारकरवाडीत महावितरणच्या ठेकेदाराचा गलथान कारभार

लोणी धामणी : जारकरवाडी (ता. आंबेगाव) येथील लोणी-जारकरवाडी मार्गे मंचरकडे जाणाऱ्या रस्त्यावर ढोबळेवाडी फाट्याजवळ महावितरणच्या ठेकेदारामार्फत अवघ्या तीन महिन्यांपूर्वी उभारण्यात आलेला नवीन विद्युत खांब तिरपा झाला आहे. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून, महावितरणच्या ठेकेदाराच्या कामाच्या दर्जाबाबत स्थानिक ग्रामस्थांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. ढोबळेवाडी फाट्याजवळ रस्त्याच्या कडेला उभारलेला हा विद्युत खांब धोकादायक स्थितीत झुकला आहे. अशा परिस्थितीत हा खांब अचानक रस्त्यावर कोसळल्यास मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेष म्हणजे, तीन महिन्यांपूर्वीच नवीन विद्युत वाहिनीचे काम करण्यात आले असताना एवढ्या कमी कालावधीत खांब वाकल्याने संबंधित कामाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पाण्याचा अपव्यय करणाऱ्या पाच नागरिकांचे नळजोड खंडित

प्रत्येकी दोन हजारांचा दंड; आळंदी नगरपरिषदेची कठोर कारवाई

आळंदी : पिण्याच्या पाण्याचा अनावश्यक वापर करून अपव्यय करणाऱ्या पाच नागरिकांविरुद्ध आळंदी नगरपरिषदेने कठोर कारवाई केली आहे. नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा विभागाने २० नोव्हेंबर रोजी केलेल्या विशेष तपासणीत पाण्याचा अपव्यय होत असल्याचे आढळल्याने संबंधित पाच नागरिकांचे नळजोड खंडित करण्यात आले. तसेच प्रत्येकाकडून दोन हजार रुपये दंडात्मक शुल्क वसूल करण्यात येणार असल्याची माहिती मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी दिली. आळंदी नगरपरिषद हद्दीत पिण्याच्या पाण्याचा वापर काटकसरीने करण्याचे आवाहन प्रशासनाकडून वारंवार करण्यात येत आहे.

शिरूरच्या लेकीची युरोपमध्ये गरुडझेप

पल्लवी अर्जुन भारती यांची पदव्युत्तर पदवी पूर्ण, प्रागमधील नामांकित अमेरिकन कंपनीत कार्यरत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



शिरुर : जिद्द, स्वावलंबन आणि आई-वडिलांच्या संस्कारांच्या बळावर शिरूर ते युरोप असा प्रेरणादायी प्रवास.... स्वप्ने ती नसतात जी आपण झोपेत पाहतो, तर स्वप्ने ती असतात जी आपल्याला झोपू देत नाहीत. या उक्तीला सार्थ ठरवत शिरूर येथील पल्लवी अर्जुन भारती हिने आपल्या जिद्दीच्या आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर युरोपमध्ये मोठे यश संपादन केले आहे. भारतातील नामांकित 'लार्सन अँड टुब्रो' (LT) कंपनीतील चांगल्या पगाराची नोकरी सोडून उच्च शिक्षणासाठी युरोप गाठणाऱ्या पल्लवीने आपली पदव्युत्तर पदवी (Master's degree) यशस्वीरित्या पूर्ण केली असून, सध्या ती झेक प्रजासत्ताकमधील (Czech Republic) प्राग येथे 'प्युअर स्टोरेज' (Pure Storage) या नामांकित अमेरिकन (US-based) कंपनीत 'सिस्टीम इंजिनिअर / सोल्यूशन आर्किटेक्ट' (System Engineer / Solution Architect) म्हणून कार्यरत आहे. पल्लवीचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण शिरूर येथील 'न्यू इंग्लिश स्कूल'मध्ये, तर कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षण 'विद्याधाम ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स, शिरूर' येथे पूर्ण झाले. त्यानंतर तिने 'गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कराड' येथून माहिती तंत्रज्ञान (Information Technology) शाखेत ८.८ सीजीपीए (CGPA) सह अभियांत्रिकीची पदवी प्राप्त केली. कॉलेजच्या कॅम्पस प्लेसमेंटमधून तिची 'लार्सन अँड टुब्रो' (LT) च्या क्लाउड डिव्हिजनमध्ये सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून निवड झाली.एल अँड टीमध्ये दोन वर्षे नोकरी करत असतानाच तिने परदेशात उच्च शिक्षण घेण्याचे आपले ध्येय निश्चित केले. नोकरी सांभाळत तिने 'आयईएलटीएस' (IELTS) परीक्षेची तयारी केली आणि जर्मन भाषाही शिकली. विशेष म्हणजे, परदेशी शिक्षणासाठी कोणत्याही कन्सल्टन्सीची मदत न घेता तिने स्वतः सर्व विद्यापीठांचा सखोल अभ्यास केला, स्वतःचे पैसे साठवले आणि सर्व कागदपत्रांची पूर्तता करून अर्ज केले. तिच्या या मेहनतीला यश आले आणि तिला चार्ल्स युनिव्हर्सिटी, मासारिक युनिव्हर्सिटी तसेच जर्मनीतील अनेक सरकारी विद्यापीठांमधून प्रवेशाची संधी मिळाली. आपल्या कार्यक्षेत्राशी सुसंगत अभ्यासक्रम आणि भविष्यातील संधी लक्षात घेता तिने झेक प्रजासत्ताकमधील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वोच्च विद्यापीठ असलेल्या 'म ासारिक युनिव्हर्सिटी'ची (Masaryk University, BA°no) निवड केली. या वर्षी (जून २०२६) तिने येथील 'फॅकल्टी ऑफ इन्फॉमटिक्स'म धून 'सॉफ्टवेअर सिस्टीम्स अँड सर्व्हिसेस मॅनेजमेंट' (स्पेशलायझेशन: स्मार्ट सर्व्हिस डिझाइन अँड सिस्टीम्स थिंकिंग) या विषयात पदव्युत्तर पदवी (Master's degree - Mgr.) यशस्वीरित्या पूर्ण केली आहे.

महात्मा फुले यांच्या शैक्षणिक क्रांतीचा वारसा

अनिकेत नितीन काळे । राष्ट्र सह्याद्री

सासवड : एका महात्म्याने पेटवलेली शिक्षणाची ज्योत आज अंतराळापासून संरक्षण क्षेत्रापर्यंत, प्रयोगशाळेपासून न्यायालयापर्यंत आणि शाळेपासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत प्रकाश पसरवत आहे त्यांच्या कार्याविषयी थोडक्यात आढावा

भारतीय समाजाच्या इतिहासात महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले यांनी घडवून आणलेली शैक्षणिक क्रांती ही केवळ शिक्षणाची सुरुवात नव्हती, तर हजारो वर्षांच्या सामाजिक विषमतेला दिलेले मोठे आव्हान होते. स्त्रीशिक्षण, बहुजनांचे शिक्षण आणि वंचित घटकांना ज्ञानाची दारे खुली करण्याचा धाडसी विचार त्यांनी प्रत्यक्ष कृतीत उतरवला. सन १८४८ मध्ये पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची शाळा सुरू करून त्यांनी भारतीय समाजात एका नव्या परिवर्तनाची मुहूर्तमेढ रोवली. या ज्ञानक्रांतीच्या वाटचालीत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी भारताच्या पहिल्या महिला शिक्षिकेच्या रूपाने ऐतिहासिक योगदान दिले.

एकोणिसाव्या शतकातील भारतीय समाज जातिभेद, अस्पृश्यता, अंधश्रद्धा, स्त्रीदास्य आणि सामाजिक विषमतेच्या विळख्यात अडकलेला होता. शिक्षण हा समाजातील काही विशिष्ट वर्गांचाच अधिकार म ानला जात होता. स्त्रिया, शूद्र, अतिशूद्र आणि वंचित समाजघटकांना शिक्षणापासून दूर ठेवले जात होते. अशा प्रतिकूल परिस्थितीत महात्मा फुले यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले. शिक्षणाशिवाय समाजाची प्रगती शक्य नाही, ही जाणीव त्यांनी समाजात रुजवली.

महात्मा फुले यांच्या शैक्षणिक कार्यातील सर्वांत महत्त्वाचा टप्पा म्हणजे मुलींच्या शिक्षणासाठी त्यांनी केलेला संघर्ष. १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची शाळा सुरू करून त्यांनी स्त्रीशिक्षणाचा नवा अध्याय सुरू केला. पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिक्षण देऊन त्यांनी शिक्षिका म्हणून कार्य करण्यास प्रोत्साहित केले. शाळेत जाताना सावित्रीबाईंना तत्कालीन समाजव्यवस्थेचा तीव्र विरोध सहन करावा लागला. त्यांच्यावर शेण, चिखल आणि दगड फेकले जात होते. मात्र, या विरोधाला न जुमानता त्यांनी शिक्षणकार्य सुरू ठेवले. महात्मा फुले यांनीही त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून ही चळवळ पुढे नेली.

महात्मा फुले यांनी मुलींच्या शिक्षणाबरोबरच शूद्र, अतिशूद्र आणि वंचित समाजातील मुलांसाठीही शिक्षणाची दारे खुली केली. १८५१ मध्ये पुण्यातील रास्ता पेठ आणि वेताळ पेठ परिसरातही मुलींच्या शाळा सुरू केल्या. त्यांच्या या कार्यात सावित्रीबाई फुले यांच्यासह फातिमा शेख यांचेही मोलाचे योगदान होते. तत्कालीन समाजव्यवस्थेचा विरोध सहन करून या सर्वांनी शिक्षणाचा प्रसार केला. त्यांच्या शैक्षणिक कार्याची तत्कालीन ब्रिटिश प्रशासनानेही १८५२ मध्ये दखल घेतली.

महात्मा फुले यांचे स्त्रीशिक्षणविषयक विचार केवळ साक्षरतेपुरते मर्यादित नव्हते. स्त्रियांना स्वतंत्र व्यक्तिमत्त्व, आत्मसन्मान आणि निर्णयक्षमता प्राप्त व्हावी, हा त्यामागील व्यापक दृष्टिकोन होता. बालविवाह, विधवांचे हाल, केशवपन आणि स्त्रियांवरील अन्यायाविरुद्ध त्यांनी आवाज उठविला. विधवांना आधार देणे आणि अनाथ बालकांचे संरक्षण करणे यासाठीही त्यांनी पुढाकार घेतला. स्त्री शिकली तर संपूर्ण कुटुंब सुशिक्षित होईल आणि पुढील पिढ्यांमध्ये शिक्षणाचे संस्कार



रुजतील, असा त्यांचा ठाम विश्वास होता.

१८७३ मध्ये महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. जातीय विषमता, धार्मिक कर्मकांड, अंधश्रद्धा आणि सामाजिक शोषणाला विरोध करून समता, बंधुता आणि विवेकनिष्ठ विचारांचा प्रसार करणे हा या संस्थेचा उद्देश होता. शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रमुख साधन असल्याची त्यांची भूमिका होती.

महात्मा फुले यांनी १८८२ मध्ये हंटर शिक्षण आयोगासमोर आपले शैक्षणिक विचार मांडले. प्राथमिक शिक्षण सर्वसामान्यांसाठी सक्तीचे आणि मोफत असावे, ग्रामीण भागातील मुलांपर्यंत शिक्षण पोहोचावे आणि बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी शासनाने विशेष प्रयत्न करावेत, अशी त्यांनी आग्रही भूमिका घेतली. शिक्षणावरील खर्च उच्चवर्गीयांच्या शिक्षणापुरता मर्यादित न राहता सामान्य जनतेच्या प्राथमिक शिक्षणासाठी व्हावा, असे त्यांचे मत होते. शिक्षण हे सामाजिक न्यायाचे प्रभावी माध्यम बनले पाहिजे, हा त्यांच्या विचारांचा गाभा होता.

'विद्येविना मती गेली, मतीविना नीती गेली, नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले.' या विचारातून त्यांनी शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले. शिक्षण म्हणजे केवळ नोकरी मिळविण्याचे साधन नसून अज्ञान, अन्याय, शोषण आणि गुलामगिरीतून मुक्त होण्याचा मार्ग आहे, हे त्यांनी समाजाला पटवून दिले.

नव्या शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीपासून डिजिटल शिक्षणाच्या विस्तारापर्यंत प्रत्येक उपक्रमात सर्वसमावेशकता आणि समान संधी या मूल्यांना महत्त्व देणे आवश्यक आहे. महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार आजही या प्रक्रियेला दिशादर्शक ठरतात. त्यांनी मांडलेली समता, स्वातंत्र्य, विवेक आणि सामाजिक न्यायाची मूल्ये आत्मसात केली, तर शिक्षणाच्या माध्यमातून देशाला अधिक प्रगत आणि समताधिष्ठित बनविता येईल.

महात्मा ज्योतिराव फुले यांनी शिक्षणाच्या माध्यमातून भारतीय समाजाला नवी दिशा दिली. मुलींच्या शिक्षणासाठी शाळा सुरू करणे, वंचित समाजासाठी शिक्षणाची दारे खुली करणे, प्राथमिक शिक्षण सर्वांसाठी उपलब्ध व्हावे यासाठी आग्रही भूमिका घेणे आणि शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे साधन बनविणे, हे त्यांचे कार्य भारतीय इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदविले गेले आहे. त्यांनी पेटविलेली शिक्षणाची ज्योत सावित्रीबाई फुले, फातिमा शेख आणि पुढील अनेक समाजसुधारकांच्या कार्यातून अधिक तेजस्वी झाली.

महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य हे केवळ एका कालखंडातील सामाजिक सुधारणा नव्हते, तर आधुनिक भारताच्या समताधिष्ठित आणि लोकशाहीवादी समाजनिर्मितीचा भक्कम पाया होता. शिक्षणापासून वंचित असलेल्या प्रत्येक घटकाला ज्ञानाच्या प्रवाहात आणणे आणि शिक्षणातून सामाजिक समता प्रस्थापित करणे, हीच त्यांच्या विचारांना खरी आदरांजली ठरेल.

भिडे वाड्यातील एका छोट्याशा शाळेतून सुरू झालेली ज्ञानक्रांती आज अंतराळाच्या अमर्याद अवकाशापर्यंत पोहोचली आहे. या ऐतिहासिक परिवर्तनाच्या मुळाशी आहे महात्मा ज्योतिराव फुले यांनी समाजाला दिलेली शिक्षणाची अमूल्य देणगी!

–प्रभाकर बारहाते,
माहिती अधिकारी
जिल्हा माहिती कार्यालय,
परभणी

शैक्षणिक क्रांतीचा आधुनिक भारतातील विस्तार

आज महात्मा फुले यांनी पेटविलेल्या शिक्षणाच्या ज्योतीचा प्रकाश देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचला आहे. एकेकाळी शिक्षणापासून वंचित असलेले समाजघटक आज विविध क्षेत्रांत आपले कर्तृत्व सिद्ध करीत आहेत. अंतराळ संशोधनात झेप घेणारे वैज्ञानिक, खगोलशास्त्रज्ञ, उपग्रह आणि अवकाश तंत्रज्ञान विकसित करणारे संशोधक, देशाच्या सीमांचे रक्षण करणारे संरक्षण दलातील अधिकारी, आधुनिक तंत्रज्ञानाची निर्मिती करणारे अभियंते अशा असंख्य व्यक्ती ज्ञानाच्या बळावर देशाच्या प्रगतीत योगदान देत आहेत.

वैद्यकीय क्षेत्रात रुग्णांचे प्राण वाचविणारे डॉक्टर, संशोधनातून नव्या उपचारपद्धती विकसित करणारे शास्त्रज्ञ, समाजाला दिशा देणारे पत्रकार, न्यायासाठी लढणारे वकील, न्यायदान करणारे न्यायाधीश, कायदा व सुव्यवस्था सांभाळणारे पोलीस अधीक्षक, प्रशासनाची धुरा सांभाळणारे जिल्हाधिकारी आणि विविध क्षेत्रांत नेतृत्व करणारे अधिकारी आज देशाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. या सर्व क्षेत्रांतील प्रगतीचा पाया ज्ञान, शिक्षण, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि समान संधी हाच आहे.

आजच्या काळातील महात्मा फुले यांच्या विचारांचे महत्त्व

आज इंटरनेट, डिजिटल तंत्रज्ञान आणि आधुनिक शिक्षणव्यवस्थेमुळे ज्ञानाची दारे अधिक व्यापक झाली आहेत. अंतराळ संशोधनापासून कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंत आणि आधुनिक विज्ञानापासून संरक्षण तंत्रज्ञानापर्यंत भारताने मोठी झेप घेतली आहे. मात्र, ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या समान संधी उपलब्ध करून देणे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना मदत करणे, मुलींचे शिक्षण सुनिश्चित करणे आणि शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे ही आव्हाने आजही कायम आहेत.

द•ख•ल



आ. कौस्तुभ गावडे यांच्याकडून कौतुक गुणवंत विद्यार्थ्यांचा केला सन्मान

निघोज : पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातून भरघोस मतांनी निवडून आलेले नवनिर्वाचित आमदार कौस्तुभ गावडे यांनी नुकतीच समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ शैक्षणिक संकुल, बेल्हे येथे सदिच्छा भेट दिली.यावेळी संस्थेच्या वतीने त्यांचा शाल, पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन संस्थेचे उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे विश्वस्त वल्लभ शेळके यांनी प्रास्ताविकातून नवनिर्वाचित आमदार कौस्तुभ गावडे यांचे स्वागत केले.शिक्षक मतदारसंघातून मिळविलेल्या विजयाबद्दल त्यांचे अभिनंदन करून पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या.समर्थ शैक्षणिक संकुलाच्या शैक्षणिक कार्याची आणि ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. या प्रसंगी समर्थच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे मत आमदार कौस्तुभ गावडे यांनी व्यक्त केले.तसेच खाजगी संस्थांना मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती लवकरात लवकर मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षकांची चर्चात्मक संवाद साधताना आमदार कौस्तुभ गावडे म्हणाले की, समर्थ शैक्षणिक संकुलाने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करून देत शैक्षणिक क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

भावी निमगाव येथे एसटी बसथांब्याला मंजुरी

अमरापुर : भावी निमगाव येथील प्रवाशांची अनेक दिवसांपासूनची एसटी बसथांब्याची मागणी अखेर पूर्ण होण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल पडले आहे. शेवगाव-पाथर्डी विधानसभा मतदारसंघाच्या आमदार मोनिका राजळे यांच्या माध्यमातून गावासाठी एसटी बसथांबा (प्रवासी निवारा) मंजूर करण्यात आला आहे. गावातील विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्वसामान्य प्रवाशांना बसची प्रतीक्षा करताना ऊन, वारा आणि पावसाचा सामना करावा लागत होता. प्रवाशांची ही गैरसोय लक्षात घेऊन प्रवासी निवाऱ्याची मागणी करण्यात आली होती. या मागणीला मंजुरी मिळाल्याने ग्रामस्थांमधून समाधान व्यक्त होत आहे. या प्रवासी निवाऱ्यामुळे प्रवाशांना बसची प्रतीक्षा करताना सुरक्षित आणि सोयीस्कर आसरा उपलब्ध होणार असून, विशेषतः विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिकांना त्याचा लाभ मिळणार आहे. ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांच्या दृष्टीने हे काम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. दरम्यान, भावी निमगावच्या विकासासाठी केलेल्या या सहकार्याबद्दल भाजप युवा मोर्चाचे शेवगाव तालुकाध्यक्ष अनिल भाऊ सुपेकर यांनी आमदार मोनिका राजळे यांचे आभार मानले आहेत. गावाच्या मूलभूत गरजांना प्राधान्य देऊन प्रवाशांसाठी सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

तुकाई उपसा सिंचन योजनेमुळे १९ गावाचे स्वप्न साकार : काकासाहेब तापकीर

मिरजगाव : कर्जत तालुक्यातील अवर्षण प्रवण क्षेत्रातील बहुचर्चित तुकाई उपसा जलसिंचन योजना महाराष्ट्रातील एक पथदर्शक योजना म्हणून गणली जाणार आहे. तिच्या पहिल्या टप्प्याचे पंप हाऊस हे डिलेवरी चेंबर तुकाई टेकडी ही ट्रायल चाचणी सोमवारी, दि. २३ नोव्हेंबर रोजी मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या हस्ते व विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखेपाटील यांच्या उपस्थितीत होणार असल्याची माहिती कर्जत तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती काकासाहेब तापकीर यांनी दिली आहे. या कार्यक्रमासाठी तालुक्यातील शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आव्हान करण्यात आले आहे. महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांच्या महत्त्वकांक्षी कामातील तुकाई चारी योजनेसाठी राज्य सरकारने ६७ कोटी रुपये मंजूर केले आहे. कर्जत तालुक्यातील १९ गावांमधील तीन लघू पाटबंधारे प्रकल्प व २४ पाझर तलाव असे एकूण २७ तलावांमध्ये पुनर्भरण करणे प्रस्तावित आहे. शेती सिंचनासाठी अत्यंत महत्त्वाचे असलेले तुकाई उपसा जलसिंचन योजना आता प्रत्यक्षात कार्यान्वित होण्याच्या मार्गावर आहे. सभापती शिंदे यांच्या अथक प्रयत्नातून मंजूर झालेल्या या योजनेचे काम आता अंतिम टप्प्यात पोहोचले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या कायम दुष्काळी व जीरायती भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बहिरोबावाडी, गुरवपिंपरी, टाकळी खंडेश्वरी, बिटकेवाडी, खुरंगेवाडी, वालवड, सुपा, चांदे. बु, चांदे खुर्द, मुळेवाडी, दगडवाडी, चिंचोली काळदात, थेटेवाडी, गोयकरवाडा, खंडाळा, वाघनळी या १९ गावाांचे शेतकरी शेतीसाठी पुरेशी पाणी मिळावे, यासाठी प्रतीक्षेत राहिले होते. या योजनेमुळे १९ गावातील शेकडो हेक्टर जमीन ओलिताखाली येणार असल्याने एकूण ८६ किलोमीटर पाईपलाईन असून त्यापैकी ५५ किलोमीटर चे काम पूर्ण झाले आहे.

शशीकांत मगर यांच्या नावाने बनावट अर्ज व सही; गुन्हा

अहिल्यानगर : येथील पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या परिसरात अज्ञात व्यक्तीने शशीकांत रामदास मगर (वय ३७, रा. मगर मळा, ससेवाडी रोड, पोस्ट-जेऊर, जि. अहिल्यानगर) यांच्या नावाने खोटा अर्ज तयार केल्याचा प्रकार समोर आला आहे. ही घटना ३० ऑक्टोबर २०२६ रोजी घडल्याचे अहवालात नमूद करण्यात आले असून, याप्रकरणी २० नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ७.४९ वाजता गुन्हा नोंदवण्यात आला आहे. भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३४० आणि ३३६(४) अन्वये गुन्हा रजिस्टर क्रमांक ६००/२०२६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी शशीकांत मगर हे शेतीचा व्यवसाय करतात आणि त्यांच्याच नावाचा व ओळखीचा गैरवापर करून हा बनावट अर्ज तयार करण्यात आला आहे. अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या नावाने बनावट सही करून सदर अर्ज खरा असल्याचे भासवण्याचा प्रयत्न केला आहे. हा बनावट अर्ज शासकीय कार्यालये आणि विविध प्राधिकरणांकडे पोस्टाने पाठवण्यात आल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे. अर्ज पाठवताना फिर्यादीचे नाव तसेच ते वापरत असलेल्या या मोबाईल क्रमांकाचा गैरवापर करण्यात आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकरणातील आरोपी अद्याप अज्ञात असून, त्याचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे. भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांनी या गुन्ह्याची माहिती व भेट नोंदवली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक योगेश पवार यांच्याकडे सोपवण्यात आला असून, त्यांचा संपर्क क्रमांक असा आहे. गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया पोलीस नाईक आर. एफ. मोरे यांनी पार पाडली आहे. घटनेचा घटनास्थळ पंचनामा तपासाच्या टप्प्यात 'होणेवर' असल्याचे दैनिक अहवालात नमूद करण्यात आले आहे. या गुन्ह्यात कोणत्याही हत्याराचा वापर झालेला नसून, हा प्रकार नॉन-टेक्निकल स्वरूपाचा असल्याचे अहवालात स्पष्ट केले आहे.

रमाई घरकुल लाभार्थी संतप्त; उपोषणाच्या सहाव्या दिवशी कर्जत बंद

प्रशासन जीव गेल्यावरच जागे होणार का ? जिल्हाध्यक्ष संजय भैलुमे यांचा सवाल

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

जीव गेल्यावरच प्रशासन येणार का ? आंदोलनकर्त्यांचा संताप

सोमवारपासून कर्जत नगरपंचायत हद्दीतील रमाई घरकुल योजनेचे लाभार्थी भीमसैनिकांसह उपोषणास बसले आहे. पाच दिवस उलटले तरी प्रशासन ढिम्म आहे. त्यांना आमचा जीव गेल्यावरच जाग येईल का ? असा सवाल आंदोलनकर्त्यांनी केला. जर सर्वसामान्य नागरिकांनाच न्याय मागणे अपराध असेल तर संबंधित अधिकाऱ्यांने त्या खुर्चीवर बसने योग्य नाही. अधिकाऱ्यांनी सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नावर काम करणे आवश्यक असल्याची प्रतिक्रिया आंदोलक समुद्र, आढाव, भैलुमे आणि साळवेंनी दिली.



कर्जत : रमाई घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना घरकुलाचा पहिला हप्ता (अनुदान) कर्जत नगरपंचायतीमधून मिळत नसल्याने भीमसैनिक व लाभार्थी मागील पाच दिवसांपासून प्रांत कार्यालयाच्यासमोर आमरण उपोषणाला बसले असून तालुका प्रशासनाकडून अद्याप पर्यंत उपोषणकर्त्यांच्या न्यायिक मागण्यांकडे दुर्लक्ष केले जात असल्याने शनिवारी आरपीआयच्यावतीने कर्जत बंद ठेवण्यात आले. यापूर्वी कर्जतच्या नगरपंचायतीस टाळे ठोकण्यात आले होते. तर शुक्रवारी संतप्त आंदोलनकर्त्यांनी महात्मा फुले चौकात ठिय्या आंदोलन केले होते.

कर्जत नगरपंचायत हद्दीतील रमाई घरकुल योजनेचे लाभार्थी आवास योजनेचा पहिला हफ्ता (अनुदान) मिळावा यासाठी भीमसैनिकांसह सोमवार, दि १६ नोव्हेंबरपासून कर्जत प्रांत कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसले आहेत. आपल्या न्यायिक मागण्यांकडे तालुका प्रशासन सपशेल दुर्लक्ष करीत असल्याने आंदोलनकर्त्यांसह कर्जत आरपीआयने बुधवारी कर्जत नगरपंचायतीस टाळे ठोकले होते. यावर देखील प्रशासन सुस्त असल्याची भावना उपोषणकर्त्यांना जाणवली गेली यावर संतप्त होत शुक्रवारी सकाळी कर्जत शहरातील नगर-बारामती रोडवरील महात्मा फुले चौकात आंदोलनकर्त्यांनी पुन्हा एकदा ठिय्या आंदोलन करीत प्रशासनास चांगलेच धारेवर धरले. आंदोलनकर्ते आक्रमक झाल्याने काही काळ वातावरण तंग झाले होते. मात्र पोलीस प्रशासनाने अखेर मनधरणी करीत त्यांना रस्त्यावर ठिय्या आंदोलन करण्यापासून परावृत्त केले. उपोषणाचा पाचवा दिवस त्यात उपोषणकर्त्यांची शारीरिक स्थिती गंभीर बनत चालली असताना देखील कर्जत नगरपंचायतीच्या प्रशासनाकडून मागण्यांबाबत कोणताही ठोस निर्णय घेतला जात नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त करीत कर्जत आरपीआयकडून जिल्हाध्यक्ष संजय भैलुमे यांच्या मार्गदर्शनाखाली अंकुश भैलुमे, नंदकिशोर भैलुमे, दत्ता कदम, विशाल काकडे, रोहन कदम, युवकचे अध्यक्ष सागर कांबळे, बबन भैलुमे, आदित्य भैलुमे, भाऊसाहेब भैलुमे, अजय भैलुमे, पवन भैलुमे, नितीन भैलुमे, आकाश साळवे, करण ओहोळ, रुपेश कटारे, अनुराग भैलुमे यांनी शनिवारी कर्जत बंदची हाक दिली होती. त्या अनुषंगाने शनिवारी कर्जत कडकडीत बंद ठेवण्यात आले होते. यावेळी भीमसैनिकांनी शहरातून हलगी बजावत सुस्त असलेल्या प्रशासनास जाग आणण्याची भूमिका घेत फेरी काढली.

व्यापारी असोसिएशन व निघोज स्पोर्ट्स क्लब उद्घाटन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

निघोज : मंगळवार रोजी व्यापारी असोसिएशन कार्यालय तसेच निघोज स्पोर्ट्स क्लब उद्घाटन सकाळी ९.३० वाजता ग्रामपंचायत कार्यालय येथे संपन्न होत असून खासदार निलेश लंके व आमदार काशिनाथ दाते सर यांच्या शुभहस्ते तसेच शिरुर तालुक्याचे माजी आमदार पोपटराव गावडे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न होत असल्याची माहिती व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष बबनराव तनपुरे यांनी दिली आहे. व्यापारी असोसिएशन कार्यालयात या उद्घाटन कार्यक्रमाच्या नियोजनाची बैठक शुक्रवारी दि.२० रोजी संपन्न झाली. यावेळी व्यापारी असोसिएशन पदाधिकारी,निघोज स्पोर्ट्स क्लब पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मंगळवार दि.१ डिसेंबर रोजी पारनेर ते पुणे ही एस टी बससेवा शिरुर आगाराच्या वतीने जगप्रसिद्ध रांजणखळगे मार्गावरून सुरू होत असून निघोज एस टी बस स्थानक परिसरात या एस टी बसचे स्वागत मंगळवारी दि.१ डिसेंबर रोजी सकाळी ७.१५ वाजता करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास निघोज परिसरातील विविध संस्थांचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. तसेच त्यानंतर ग्रामपंचायत कार्यालय ईमारतीत असलेल्या व्यापारी असोसिएशन कार्यालय व निघोज स्पोर्ट्स क्लबचे उद्घाटन खासदार निलेश लंके व आमदार काशिनाथ दाते सर यांच्या शुभहस्ते सकाळी ९.३० वाजता होणार आहे. त्यानंतर होणाऱ्या जाहीर कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार पोपटराव गावडे व प्रमुख मान्यवर व विविध संस्थांचे पदाधिकारी व ग्रामस्थ व मुंबईकर मंडळ यांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन व्यापारी असोसिएशन, निघोज स्पोर्ट्स क्लब पदाधिकारी व सदस्य यांनी केले आहे.

निघोज एसटी बस स्थानकसाठी २० लाखाचा नव्हे एक कोटीचा निधी आवश्यक

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

निघोज : आ. काशिनाथ दाते यांनी तालुक्यातील एस टी बस स्थानकसाठी परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे पाठपुरावा करुन सहा बसस्थानकासाठी प्रत्येकी वीस लाख रुपये अशाप्रकारे एक कोटी वीस लाख रुपयांचा निधी मंजूर करुण घेतला आहे. मात्र निघोज गावची लोकसंख्या तसेच एस टी बस स्थानक परिसरात असणारी प्रवाशांची गर्दी लक्षात घेता मंजूर झालेल्या सहा गावांचा विचार करता निघोजची लोकसंख्या सर्वाधिक आहे. निघोजसाठी २० लाखाचा नव्हे तर एक कोटी रुपयांचा निधी आवश्यक आहे अशी मागणी निघोज ग्रामस्थांनी केली आहे. निघोज एस टी बस स्थानक परिसरात सातत्याने पहाटे ५ ते रात्री ११ वाजेपर्यंत प्रवाशांची गर्दी असते. पुणे, मुंबई, कल्याण, अहिल्यानगर, आळेफाटा,शिरुर या ठिकाणी जाण्यासाठी व येण्यासाठी प्रवाशांना निघोजच्या एस टी बस स्थानक परिसरात तासन् तास तिष्ठत बसावे लागते. निघोज



येथून जाणाऱ्या शिरुर व पारनेर आगाराच्या जवळपास पंचवीस पेक्षा जास्त एस टी बसेस निघोज मार्गे शहरांकडे धावतात. निघोज एस टी बस स्थानक ईमारत जर आज पाहिली तर ही इमारत आहे की पत्र्याचे शेड हा संशोधनाचा भाग आहे. या ठिकाणी एस टी बस स्थानक परिसरात परिवहन मंडळाची एक हजार स्क्वेअर फूट जागा उपलब्ध आहे. तसेच परिसरात सुद्धा मोठ्या प्रमाणात मोकळी जागा उपलब्ध आहे. मात्र ना या ठिकाणी स्वतागृह ना सावली अशी परिस्थिती आहे. निघोज गावची लोकसंख्या जवळपास २५ हजारांच्या आसपास आहे. पारनेर तालुक्यातील एक मोठे गाव व आर्थिक समृद्धीने विकसीत झालेले गाव म्हणून गावचा नावलौकिक राज्यात आहे. मात्र एस टी बस स्थानक पाहिल्यास हे निघोज आहे की चुकून आपण दुसऱ्याच गावात आलो अशी शंका नवीन प्रवाशांना होत आहे एवढे दुर्लक्षित बसस्थानक निघोज मध्ये आहे. जगप्रसिद्ध रांजणखळगे हे पर्यटन क्षेत्र चार किलोमीटर अंतरावर आहे. राज्यातील जागृत देवस्थान असलेल्या मळगंगा देवीचे जागृत देवस्थान निघोज मध्ये आहे. सातत्याने या ठिकाणी देवीच्या दर्शनासाठी व कुंड पर्यटन क्षेत्र पाहण्यासाठी राज्य व परराज्यातील भाविक व देव विदेशातील पर्यटक मोठ्या संख्येने या ठिकाणी येत असतात मात्र एस टी बस स्थानक नुतनीकरण करण्याचा पाठपुरावा मात्र अद्याप कुणी केला नाही मात्र आमदार काशिनाथ दाते सर यांनी मात्र निघोज एस टी बस स्थानक साठी वीस लाख रुपयांचा निधी मंजूर करुण घेतला आहे. याबद्दल ग्रामस्थ, व्यापारी असोसिएशन व पत्रकार संघ यांनी दाते सर यांच्या अभिनंदनाचा ठराव मंजूर केला. मात्र हा निधी तोकडा असून गावच्या लोकसंख्येचा तसेच प्रवासी संख्या लक्षात घेऊन निघोज एस टी बस स्थानक साठी किमान एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून द्या अशी मागणी ग्रामस्थ, व्यापारी असोसिएशन व पत्रकार संघ यांनी एका बैठकीत केली असून लवकरच वरील पदाधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ आमदार दाते सर यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन देणार आहेत.

'अंबाबाईचा अंगारा'च्या यशानंतर आता 'अंबाबाईचा आशीर्वाद'

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

निघोज : अल्पावधीतच आपल्या दर्जेदार कथा, प्रभावी अभिनय आणि ग्रामीण जीवनाचा अस्सल स्पर्श असलेल्या कलाकृतींमधून प्रेक्षकांची मनं जिंकणाऱ्या 'देवी भोयरे फिल्म प्रोडक्शन' या धाँढींलश चॅनेलवर आता आणखी एक दमदार कलाकृती प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. 'अंबाबाईचा अंगारा' या भागाला मिळालेल्या अभूतपूर्व प्रतिसादानंतर टीम आता 'अंबाबाईचा आशीर्वाद' हा नवा एपिसोड सादर करत आहे.

गावची कला, गावातील कलाकार आणि गावच्या मातीची संस्कृती पुढे गेली पाहिजे, या उदात्त हेतूने नेहमीच कलाक्षेत्राला खंबीर साथ देणारे चॅनेलचे निर्माते (प्रोड्युसर) विकास शेठ सावंत यांचे या संपूर्ण प्रवासात मोलाचे योगदान आहे. ग्रामीण भागातील होतकरू कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणे, त्यांना प्रोत्साहन देणे आणि स्थानिक कलागुणांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विकास शेठ सावंत सातत्याने प्रयत्नशील असतात. त्यांच्या पाठबळामुळेच गावातील कला आज नव्या उंचीवर पोहोचत आहे. 'अंबाबाईचा अंगारा' या कलाकृतीला प्रेक्षकांनी दिलेल्या भरघोस प्रेमानंतर 'अंबाबाईचा आशीर्वाद'मधूनही कौटुंबिक नात्यांची वीण, भावनिक गुंतागुंत आणि ग्रामीण मातीचा सुगंध अनुभवायला मिळणार आहे.

या निर्मितीमागे संपूर्ण टीमची मेहनत, लेखन, अभिनय आणि तांत्रिक बाजूंची उत्तम सांगड घातली गेली असून, गावातील कलावंतांच्या मेहनतीला निर्मात्यांच्या विश्वासाची जोड मिळाल्याने ही कलाकृती अधिकच खास ठरली आहे.

आगामी 'अंबाबाईचा आशीर्वाद' या एपिसोडलाही 'अंबाबाईचा अंगारा'प्रमाणेच रसिकप्रेक्षकांनी भरभरून प्रेम आणि प्रतिसाद द्यावा, असे आवाहन 'देवी भोयरे फिल्म प्रोडक्शन'च्या वतीने करण्यात आले आहे. प्रोडूसर निर्माता, विकास शेठ सावंत, लेखन दिग्दर्शक, संदीप बेलोटे, सह दिग्दर्शक संजय कुटे, डीओपी, प्रशांत टाकसाळ कलाकार, संदीप बेलोटे,पायल राजगुरू, मंगल मगर, दिव्या , शिवाजी बापू सरडे,विकास लंके, गजानन लंके, भास्कर चौधरी, केतन कोकाटे, आकाश साळवे,रितेश पोपळघट, प्रमोद आहेर बालकलाकार - स्वराज बेलोटे, त्रिशा लंके, भूमी भोजने, आदी कलाकार आहेत .

पारनेरच्या चेतन रेपाळेची राष्ट्रीय स्तरावर कामगिरी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



पारनेर : अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्याचा युवा कुस्तीपटू पै. चेतन शिवाजी रेपाळे याने आग्रा (उत्तर प्रदेश) येथे झालेल्या वरिष्ठ गट फ्रीस्टाइल राष्ट्रीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेत दमदार कामगिरी करत कांस्यपदक पटकावले.भारतीय कुस्तीगीर संघाचे माजी अध्यक्ष व खासदार बृजभूषण शरण सिंह यांच्या हस्ते पदक प्रदान करण्यात आले. पै. चेतन रेपाळेच्या या यशामुळे पारनेर तालुक्यासह अहिल्यानगर जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. शिवछत्रपती कुस्ती संकुल, पारनेरच्या शिरपेचातही आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

पुणेवाडी येथील चेतन रेपाळे हा वस्ताद नगरसेवक पै. युवराज पठारे यांचा भाचा असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली सन २०१८ पासून शिवछत्रपती कुस्ती संकुलात कुस्तीचे प्रशिक्षण घेत आहे. सध्या तो १२५ किलो वजन गटात कुस्ती खेळतो.

चेतनने यापूर्वीही विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश मिळवले आहे. महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा २०२५ मध्ये त्याने कांस्यपदकाची कमाई केली. तसेच शेवगाव येथे झालेल्या देवाभाऊ केसरी स्पर्धेत पुण्याच्या कौतुक डफडे याला ७-५ अशा गुणांनी पराभूत करत विजेतेपद पटकावले. या विजयाबद्दल त्याला चांदीची गदा व रोख पारितोषिक देण्यात आले. पाथर्डी येथे झालेल्या राजे छत्रपती कुस्ती स्पर्धेत धुळेच्या हृतिक राजपूत याला ५-० ने पराभूत करून त्याने उत्तर महाराष्ट्र केसरी किताबही जिंकला.

४ नोव्हेंबर २०२६ रोजी वारजे (पुणे) येथे झालेल्या राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर त्याची आग्रा येथील राष्ट्रीय स्पर्धे साठी निवड झाली होती.

येळपणेत गोमातेचे आगळेवेगळे डोहाळे जेवण

शेकडो सुवासिनींनी भरली ओटी! सांगळे बंधूंचा सांस्कृतिक उपक्रम

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



श्रीगोंदा : भारतीय संस्कृतीत गोमातेला असलेले पूजनीय स्थान अधोरेखित करणारा आगळावेगळा सोहळा येळपणे येथे उत्साहात पार पडला. प्रा. राजेश सांगळे व सतीश सांगळे या सांगळे बंधूंनी गोमातेच्या डोहाळे जेवणाचा अनोखा उपक्रम आयोजित केला होता. या सोहळ्याला शेकडो सुवासिनींसह ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

कार्यक्रमासाठी आकर्षक मंडप, विद्युत रोषणाई आणि सुंदर सजावट करण्यात आली होती. ब्राह्मणांच्या मंत्रोच्चारात सुवासिनींनी गोमातेची विधिवत ओटी भरून साडी-चोळी अर्पण केली. खण, नारळ आणि विविध साहित्याची ओटी भरत महिलांनी गोमातेप्रती आपली श्रद्धा व्यक्त केली.

या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे ग्रामस्थांनी गोमातेच्या सेवेसाठी दिलेला आहेर! ओले गवत, हिरवा चारा, ऊस, सुका मेवा, पेंड, मुरघास आणि भुसा अशा स्वरूपात आहेर देण्यात आला. आनंदाश्रम पायी दिंडी सोहळ्याच्या वतीनेही भुसा व पेंडीच्या गोण्या देण्यात आल्या. त्यामुळे धार्मिक श्रद्धेसोबतच गोसेवेचा सामाजिक संदेशही या उपक्रमातून देण्यात आला.

यावेळी कुकडी सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष विवेक पवार, बाळासाहेब नाहाटा, निलेश ढुस, बाळासाहेब थोरात, सतीश होलसेल, निवासदादा धावडे, अमोल देशमुख, पप्पू दिवेकर, मच्छिंद्र चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते.

सांगळे परिवाराच्या वतीने उपस्थितांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.

गोमातेच्या डोहाळे जेवणाच्या या अनोख्या सोहळ्याने येळपणे परिसरात धार्मिक उत्साहाचे आणि गोसेवेच्या संस्कारांचे दर्शन घडविले.

कोकाटेंचा कार्यकर्त्यांसह भाजपात प्रवेश



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

चिचोंडी पाटील : नगर तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष तथा संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीचे मा.सदस्य अशोक कोकाटे यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. नगर, राहुरी व पाथर्डी विधानसभा मतदारसंघाचे आमदार अक्षय कर्डिले यांच्या नेतृत्वाखाली हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग यांनी कोकाटे यांची जिल्हा सचिवपदी नियुक्ती करून त्यांना नियुक्तीपत्र प्रदान केले.

यावेळी बोलताना आमदार अक्षय कर्डिले म्हणाले की, अशोक कोकाटे हे कार्यक्षम असून त्यांना जिल्हा सचिवपदाची जबाबदारी मिळाली आहे. या पदाच्या माध्यमातून पक्ष संघटन मजबूत करण्याबरोबरच सर्वसामान्य जनतेची कामे मार्गी लावण्यासाठी त्यांचा जनतेला निश्चितच फायदा होईल. यावेळी जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, साहित्यिक डॉ. संजय कळमकर आणि शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री

रविवार, दि.२२ नोव्हेंबर २०२६ । पान ८

कमी खर्चात अधिक उत्पादनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करा : आ. काळे

कर्मवीर कृषी महोत्सवाचे उद्घाटन



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कोळपेवाडी : दुष्काळी परिस्थितीमुळे यंदा पाणीटंचाईचे संकट निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुढील सहा ते आठ महिने शेतकऱ्यांसाठी आव्हानात्मक ठरणार आहेत. या परिस्थितीवर मात करण्यासाठी कमी खर्चात अधिक उत्पादन घेणे आवश्यक आहे. त्यासाठी शेतीला विज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन आमदार आशुतोष काळे यांनी केले. माजी खासदार कर्मवीर शंकरराव काळे यांच्या १४ व्या पुण्यस्मरणानिमित्त कोळपेवाडी येथील गौतम पब्लिक स्कूलच्या मैदानावर कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व कर्मवीर शंकरराव काळे मित्रमंडळाच्या वतीने आयोजित कर्मवीर कृषी महोत्सवाचे उद्घाटन माजी साखर आयुक्त शेखर गायकवाड यांच्या हस्ते झाले. माजी आमदार अशोकराव काळे अध्यक्षस्थानी होते.

माजी साखर आयुक्त शेखर गायकवाड यांनी यावेळी उपस्थित शेतकऱ्यांशी दिलखुलासपणे संवाद साधतांना सांगितले की, शासनाच्या सेवेत असतांना शेतकरी आणि साखर कारखानदारीच्या बाबतीत घेतलेल्या अनेक निर्णयामुळे शेतकरी आणि साखर कारखाना दोघांचाही फायदा झाला.

शेती झपाट्याने बदलत असून पुढील पिढी शेती करेल का? प्रश्न मनाला पडत असला तरी भविष्यात शेतीला चांगले दिवस येणार आहे. शेती संशोधनाचा वेग कमी असून दुर्दैवाने छोट्या शेतकऱ्यांच्या गरजेनुसार संशोधन होत नाही. तरी देखील शेतकऱ्यांनी उपलब्ध नवतंत्रज्ञानाचा शेतीत प्रयोग करून कष्ट कसे कमी होतील याचा प्रयत्न करावा. प्रीसिजन फार्मिंगचा मोठ्या प्रमाणावर उपयोग आपल्या राज्यात आणि देशात व्हायला हवा. पाण्याचा एक एक थेंब अतिशय महत्वाचा असल्याने पाणी जपून वापरावे.परदेशात अतिशय आधुनिक पद्धतीने शेती केली जाते. परदेशात एआय तंत्रज्ञान, आधुनिक मशिनरी आणि सूक्ष्म नियोजन केल्यामुळे शेतकऱ्यांचे आयुष्य अतिशय सोप झालेलं असून कर्मवीर कृषी महोत्सवासारख्या उपक्रमातून शेतकऱ्यांना या आधुनिक तंत्रज्ञानाची सखोल ओळख होणार असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.

आमदार काळे म्हणाले की, कर्मवीर शंकरराव काळे यांनी कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना देश-विदेशातील आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून दिली. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

आधुनिक शेतीची साधने एकाच छताखाली

महोत्सवात आधुनिक ट्रॅक्टर, शेतीची अवजारे, फवारणी ड्रोन, सिंचन साहित्य, सौर कृषिपंप, मल्चिंग पेपर, जैविक औषधे, सुधारित बियाणे, पशुखाद्य, गांडूळ खत निर्मिती साहित्य आदींचे प्रदर्शन मांडण्यात आले आहे. याशिवाय दररोज ३८ ते ४० लिटर दूध देणारी संकरित गाय, पुंगनूर जातीची गाय, शेळ्या-बोकड आणि २.०८ फूट उंचीची राधा म्हैस हे आकर्षण ठरत आहे. पहिल्याच दिवशी शेतकऱ्यांनी मोठी गर्दी करून विविध साधनांची माहिती घेतली. यावेळी मोफत सर्वरोग निदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले होते.

यावेळी कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे व्हा.चेअरमन दिनार कुदळे, सर्व संचालक मंडळ, कर्मवीर शंकरराव काळे मित्रमंडळाचे अध्यक्ष कारभारी आगवन, उपाध्यक्ष नारायणराव मांजरे, जिल्हा कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, तालुका कृषी अधिकारी मनोज सोनवणे, सर्व संलग्न संस्थांचे चेअरमन, व्हा.चेअरमन, संचालक, अधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते, यावेळी मोफत सर्वरोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

गोशाळांसाठी कृषी दराने मिळणार जमीन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

मुंबई : राज्यातील गोशाळांसाठी जमीन खरेदी, दानपत्र किंवा भाडेकरार करताना आता व्यावसायिक दर न लावता कृषी दर लागू करण्याचा महत्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला. अकोल्यातील एका संस्थेला लावण्यात आलेल्या व्यावसायिक दराबाबत केंद्रिय मंत्री नितीन गडकरी आणि आमदार प्रवीण दटके यांनी मुख्यमंत्री तसेच महमूलमंत्र्यांना पत्र पाठविल्यानंतर अशा संस्थांना कृषी दर लावण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला.तसेच यापुढे अधिकृत गोशाळा चालविणा-या संस्थांना २५ लाख रूपयांचे अनुदान देण्याचा निर्णयदेखील घेण्यात आला आहे. याबाबतचे परिपत्रक महसूल विभागाने जारी केले आहे.

गोशाळेतून सेवाभाव जपला जातो असे सांगून महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, भटक्या, आजारी, वृद्ध, अपघातग्रस्त गोवंशाचे संगोपन होते. देशी गोवंशाच्या जतनासह चारा लागवड होत असल्याने गोशाळा व्यावसायिक दरातून वगळण्याचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी स्पष्टता नसल्याने जमीन खरेदी, दानपत्र किंवा भाडेकरारावेळी या संस्थांना व्यावसायिक कंपनी समजून निवासी किंवा औद्योगिक दराने मूल्यांकन केले जात होते.

अकोला जिल्ह्यातील आलेगाव येथील 'वर्धमान गोतिर्थ' संस्थेच्या जमीन खरेदीच्यानिमित्ताने ही बाब समोर आली होती. या संदर्भात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व आमदार प्रवीण दटके यांनी मुख्यमंत्री तसेच महसूलमंत्र्यांकडे निवेदन दिले होते.

गोशाळांसाठी २५ लाखांचे अनुदान

गोशाळांना चारा लागवड व जनावरांच्या संगोपनाचा व्यवसाय आर्थिकदृष्ट्या परवडणारा आणि शाश्वत व्हावा, यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून अधिकृत गोशाळांना २५ लाख रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णयही सरकारने घेतला आहे. मुख्यमंत्री, महसूलमंत्री आणि मंत्रिमंडळ उपसमिती राज्यातील प्रत्येक गोशाळा मजबूत करण्यासाठी कार्यरत असल्याचेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

अहिल्यानगर एमआयडीसी हद्दीतून १३ वर्षीय मुलगा बेपत्ता



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री


नेवासा : एमआयडीसी अहिल्यानगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून १३ वर्षीय अल्पवयीन मुलगा दि.२१ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता बेपत्ता झाला असून आहे. सदर मुलगा आढलल्यास घेण्यासाठी पोलिसांशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आई रागावल्याच्या कारणावरून सदर मुलगा कोणालाही काहीही न सांगता राहत्या घरातून निघून गेला. मात्र, बराच वेळ होऊनही तो घरी परतला नसल्याने कुटुंबीयांकडून त्याचा शोध घेण्यात येत आहे. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या वतीने मुलाचा अलीकडील फोटो व वर्णन अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे, पोलीस नियंत्रण कक्ष तसेच संबंधित पोलीस यंत्रणांना पाठविण्यात आले असून सदरचा मुलगा आढळून आल्यास त्वरित संपर्क साधावा असे आवाहन नेवासा पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी केले आहे.

संवत्सर येथे कार-दुचाकीची समोरासमोर धडक; दोघे ठार, एक गंभीर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कोपरगाव : कोपरगाव तालुक्यातील संवत्सर शिवारात कार आणि दुचाकीची समोरासमोर जोरदार धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात दुचाकीवरील दोघांचा जागीच मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला. शुक्रवारी (दि. २०) रात्री साडेदहाच्या सुमारास वैजापूर रोडवरील कांदा मार्केटजवळ ही घटना घडली. अपघातानंतर जखमींना मदत न करता कारचालक घटनास्थळावरून पसार झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, अमोल रुखारी, महेश दिनकर कु-हे आणि कुणाल शांताराम धोकरट हे तिघे छत्रपती संभाजीनगर येथील खाटूश्याम मंदिरातील ड्युटीचे काम संपवून दुचाकीवरून संगमनेरकडे परतत होते. संवत्सर शिवारातील कांदा मार्केटजवळ आले असता समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या राखाडी रंगाच्या मारुती स्विफ्ट कारने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक एवढी भीषण होती की दुचाकीच्या पुढील भागाचा पूर्णपणे चक्काचूर झाला. या अपघातात अमोल रुखारी आणि महेश दिनकर कु-हे यांचा जागीच मृत्यू झाला, तर कुणाल शांताराम धोकरट गंभीर जखमी झाले. अपघाताचा आवाज ऐकून परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमीला तातडीने रुग्णालयात



उपचारासाठी दाखल केले. दरम्यान, अपघातानंतर कारचालक घटनास्थळावरून फरार झाल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. घटनेची माहिती मिळताच कोपरगाव शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. याप्रकरणी अज्ञात कारचालकाविरुद्ध कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस निरीक्षक उद्धव डमाले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संदीप सोन्ने पुढील तपास करीत आहेत. या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, भरधाव वाहनांमुळे रस्ते अपघातांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

जयप्रकाश उर्फ सोनू बेग यास जामीन मंजूर

ॲड. अविनाश लिप्टे यांचा युक्तिवाद ठरला महत्त्वाचा बीएनएस कलम १०९ लागू होत नसल्याचा युक्तिवाद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : खुनाचा प्रयत्न केल्याच्या आरोपाखाली श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यातील आरोपी जयप्रकाश उर्फ सोनू उर्फ सोन्या अशोक बेग यास अतिरिक्त सत्र न्यायालयाने नियमित जामीन मंजूर केला आहे. अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. एन. साळवे यांनी २१ नोव्हेंबर २०२६ रोजी हा आदेश दिला.

बेग यांच्या वतीने बाजू मांडताना ड. अविनाश लिप्टे यांनी प्रस्तुत आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम १०९ अन्वये खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा प्रथमदर्शनी लागू होत नसल्याचा युक्तिवाद केला. आरोपी बेग यांना या गुन्ह्यात खोटे गोवण्यात आल्याचेही त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. आरोपीची या कथित गुन्ह्यात नेमकी भूमिका नसून, जास्तीत जास्त कलम ११८ अन्वये गुन्हा लागू होऊ शकतो, अशी भूमिका त्यांनी मांडली. या प्रकरणाचा तपास पूर्ण झाला असून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल झाले आहे. त्यामुळे आरोपीला आणखी कोठडीत ठेवण्याची आवश्यकता नसल्याचा युक्तिवादही बचाव पक्षाने केला. तसेच केवळ गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या आधारे जामीन नाकारता येणार नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

सरकारी पक्षाने आरोपीच्या जामिनाला विरोध करत गुन्ह्याचे गांभीर्य, जखमी फिर्यादीला झालेल्या दुखापती आणि आरोपीच्या पूर्वीच्या गुन्हेगारी नोंदींचा मुद्दा उपस्थित केला होता. मात्र, तपास पूर्ण होऊन दोषारोपपत्र दाखल झाले असल्याने तसेच खटला निकाली निघण्यास वेळ लागण्याची शक्यता असल्याने न्यायालयाने काही अटी व शर्तींसह जामीन मंजूर केला.

न्यायालयाने आरोपीला एक लाख रुपयांचा जामीन बाँड व तेवढ्याच रकमेचा सक्षम जामीनदार सादर करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच दर सोमवारी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात हजेरी लावणे, साक्षीदारांवर दबाव न आणणे आणि न्यायालयाच्या परवानगीशिवाय अधिकारक्षेत्र सोडू नये, अशा अटी घातल्या आहेत. या प्रकरणात ॲड. अविनाश लिप्टे व ॲड. आकाश गायकवाड यांनी काम पाहिले. त्यांना अजिंक्य गायकवाड व चेतन बागडे यांनी मदत केली.

जिल्हा बँकेच्या पहिल्या महिन्याचे मानधन 'स्नेहालय'ला : डॉ. सुजय विखे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर मिळणाऱ्या पहिल्याच महिन्याच्या मानधनाचा विनियोग डॉ. सुजय विखे पाटील यांनी सामाजिक कार्यासाठी करण्याचा निर्णय घेतला आहे. पहिल्या महिन्याचे संपूर्ण मानधन त्यांनी अहिल्यानगरमधील 'स्नेहालय' या सामाजिक संस्थेला देण्याचे ठरविले असून, यापुढेही दर महिन्याला मिळणारे मानधन वेगवेगळ्या सामाजिक संस्थांना देण्याचा संकल्प त्यांनी केला आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर डॉ. विखे पाटील यांनी घेतलेल्या या निर्णयाची विशेष चर्चा होत आहे. सार्वजनिक पदावर काम करताना मिळणाऱ्या मानधनाचा उपयोग समाजातील गरजू घटकांसाठी व्हावा, अशी त्यामागची भूमिका आहे. त्यामुळे पहिल्या महिन्याच्या मानधनासाठी त्यांनी स्नेहालय संस्थेची निवड केली.

समाजातील वंचित, निराधार आणि गरजू घटकांसाठी स्नेहालय संस्था अनेक वर्षांपासून काम करत आहे. सामाजिक प्रश्नांवर केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष मदतीच्या माध्यमातून काम करणाऱ्या संस्थांना आर्थिक बळ मिळणे आवश्यक असते. अशा संस्थांच्या कार्याला हातभार



लावण्याच्या उद्देशाने डॉ. विखे पाटील यांनी आपले मानधन संस्थेला देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयातील महत्त्वाची बाब म्हणजे, मदतीचा हा उपक्रम केवळ पहिल्या महिन्यापुरता मर्यादित राहणार नाही. अध्यक्षपदाच्या कार्यकाळात दर महिन्याला मिळणारे मानधन जिल्ह्यातील वेगवेगळ्या सामाजिक आणि सेवाभावी संस्थांना देण्यात येणार आहे. त्यामुळे विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या संस्थांच्या कार्याला प्रोत्साहन मिळण्याबरोबरच त्यांच्या उपक्रमांना आर्थिक आधारही मिळू शकणार आहे.

जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदावरून शेतकरी आणि सहकार क्षेत्राच्या प्रश्नांवर काम करण्याची मोठी जबाबदारी असताना सामाजिक क्षेत्रातील संस्थांचाही विचार करण्याची भूमिका डॉ. विखे पाटील यांनी घेतली आहे. त्यांच्या या निर्णयातून सार्वजनिक जीवनातील जबाबदारी केवळ पदाच्या कामकाजापुरती मर्यादित नसून समाजाप्रती असलेल्या बांधिलकीशीही जोडलेली आहे.

उसाला पहिली उचल साडेचार हजार रुपये मिळवणारच!

नेवासा तालुका शेतकरी संघटनेचा आक्रमक पवित्रा; ज्ञानेश्वर कारखान्याचा साखरेचा ट्रक रोखला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : उसाला पहिली उचल प्रतिटन ४ हजार ५०० रुपये मिळावी आणि सी. रंगराजन समितीच्या महसूल वाटप सूत्रानुसार (रेव्हेन्यू शेअरिंग) शेतकऱ्यांना उसाचा रास्त भाव मिळावा, या मागणीसाठी नेवासा तालुका शेतकरी संघटनेने आक्रमक भूमिका घेतली आहे. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी मेजर अशोक काळे आणि युवा अध्यक्ष डॉ. रोहित कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली भेंडा येथील श्री ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचा साखरेचा ट्रक अडवून आंदोलन केले. आंदोलकांच्या आक्रमक भूमिकेमुळे संबंधित ट्रक कारखान्याकडे माघारी पाठविण्यात आला. शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष ड. अजित काळे यांच्या सूचनेनुसार राज्यभर साखरेचे ट्रक रोखण्याचे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. पश्चिम महाराष्ट्रातील काही साखर कारखान्यांनी उसाला प्रतिटन चार हजार रुपयांपर्यंत पहिली उचल देण्यास सुरुवात केली असताना अहिल्यानगर जिल्ह्यात मात्र शेतकऱ्यांना केवळ ३ हजार १०० रुपयांवर समाधान मानावे लागत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील ऊस



उत्पादक शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.

उसाची कमी रिकव्हरी असल्याचे कारण पुढे करून कारखानदारांकडून उसाचा भाव कमी दिला जात असल्याचा आरोप संघटनेने केला. प्रत्यक्षात साखरेचे उत्पादन, वजनातील तफावत आणि उपपदार्थांच्या उत्पन्नाचा योग्य हिशेब शेतकऱ्यांसमोर मांडला जात नसल्याचा संघटनेचा दावा आहे. एका टन उसापासून साखरेबरोबरच मळी, बगॅस, इथेनॉल, अल्कोहोल, स्पिरीट आणि सहवीज निर्मिती अशा विविध माध्यमांतून कारखान्यांना आठ ते बारा हजार रुपयांपर्यंत उत्पन्न मिळते. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचा रास्त मोबदला मिळणे आवश्यक आहे. सी. रंगराजन समितीच्या ७०:३० महसूल वाटप सूत्रानुसार एकूण उत्पन्नातील ७० टक्के हिस्सा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना, तर ३० टक्के हिस्सा कारखाना व्यवस्थापनासाठी मिळणे अपेक्षित आहे. मात्र, कारखान्यांमधील वाढता भ्रष्टाचार, अयोग्य व्यवस्थापन आणि कर्जाचा बोजा यामुळे शेतकऱ्यांच्या हक्काच्या पैशावर परिणाम होत असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

विशेष म्हणजे, साखरेची किमान आधारभूत किंमत २०१९ पासून ३१ रुपये प्रतिकिलोवर कायम असल्याने ती किमान ६० रुपये करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. साखरेचा बाजारभाव आणि उपपदार्थांपासून मिळणारे उत्पन्न विचारात घेता शेतकऱ्यांना साडेचार हजार रुपये पहिली उचल देणे शक्य असल्याचा दावा संघटनेने केला. आंदोलनादरम्यान कारखान्याचे उपाध्यक्ष काकासाहेब नरवडे, व्यवस्थापकीय संचालक अनिल शेवाळे आणि संचालक अशोकराव मिसाळ यांनी आंदोलकांशी चर्चा केली. मात्र, साखरेची विक्री प्रतिकिलो ६० रुपयांपेक्षा कमी दराने करू नये, अशी ठाम भूमिका शेतकरी संघटनेने मांडली. कारखाना व्यवस्थापनानेही शेतकऱ्यांच्या भावना लक्षात घेऊन केंद्र सरकारकडे साखरेची किमान आधारभूत किंमत वाढविण्यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

यावेळी जिल्हा उपाध्यक्ष हरिभाऊ तुवर, तालुका उपाध्यक्ष बाबासाहेब नागोडे, ड. बाळासाहेब कावळे, दादासाहेब नाबदे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या घामाला योग्य दाम मिळालाच पाहिजे. ऊस उत्पादकांच्या आर्थिक प्रश्नांकडे दुर्लक्ष झाल्यास साखर रोखण्याचे आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही संघटनेने दिला आहे.